www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 266 वा मंगळवार दि. 10 जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## राजा रघुवंशी हत्याकांड प्रकरणी सोनमचा पहिला जबाब आला समोर,

### पोलिसांसमोर धक्कादायक खुलासे, म्हणाली 'एका गाडीत.

इंदोरमधील राजा रघुवंशी हत्या प्रकरणी आणखी एक धक्कादायक खुलासा झाला आहे. पोलिसांनी याप्रकरणी उत्तर प्रदेशच्या गाजीपूर येथून सोनमसह चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. चौकशीदरम्यान सोनमने मोठा खुलासा केला आहे. सोनमने पहिल्यांदाच पोलिसांसमोर आपला जबाब नोंदवला असून, माझा पती राजा रघुवंशीची हत्या काही अज्ञात संशयित लोकांनी केल्याचा दावा केला आहे. माझं अपहरण करण्यात आलं होतं, त्यानंतर मला एका खोलीत बंद करण्यात आलं होतं. कारमध्ये बसवून मला एका ढाब्याच्या बाहेर सोडण्यात आलं असं तिने जबाबात सांगितलं आहे.



सोनमने सांगितलं की, रविवारी रात्री तिला ढाब्यावर आणण्यात आलं होतं. तिचं म्हणणं आहे की, मी रात्री ढाबा मालकाचा फोन घेऊन माझ्या भावाला फोन केला होता. त्यानंतर पोलीस आले आणि मला अटक केलं. सोनम रघुवंशी सध्या गाजीपूर येथे आहे, जिथे पोलीस सोनमला कोर्टात हजर करणार आहेत. यानंतर तिला मेघालयला नेलं जाणार आहे.

सोनमसहित पाच जणांना अटक

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात आतापर्यंत सोनमसह 5 जणांना अटक करण्यात आली आहे. यापैकी तीन आरोपींना मध्य प्रदेशातून आणि एका आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. राज कुशवाहाला इंदोरमधून, विशाल उर्फ विक्की ठाकूरला इंदोरमधून, आकाश राजपूत ला ललितपूरमधून, आनंदला बिना (मध्य प्रदेश) मधून आणि सोनम रघुवंशीला यूपीतील गाजीपूरमधून अटक करण्यात आली आहे. यानंतर आणखी अनेक धक्कादायक खुलासे होऊ शकतात.

काय आहे नेमकं प्रकरण?

राजा आणि सोनमचे 11 मे रोजी लग्न झालं आणि 20 मे रोजी ते मेघालयात हनिमूनसाठी निघाले. त्यानंतर एक दिवस ते राजधानी शिलाँगमध्ये होते. 23 मे रोजी, एका होमस्टेमधून बाहेर पडल्यानंतर, दोघेही बेपत्ता झाले. त्यांनी भाड्याने घेतलेली स्कूटर जवळच्या गावात सोडून दिलेली आढळली.

अनेक दिवसांच्या शोधानंतर, 2 जून रोजी राजाचा मृतदेह एका दरीत सापडला. पोलिसांना राजाच्या हत्येसाठी वापरलेले हत्यार, चाकू देखील सापडला. दोन दिवसांनंतर, पोलिसांना एक रक्ताचे डाग असलेला रेनकोट सापडला, जो आकाराने खूप मोठा होता. त्यामुळे बेपत्ता पत्नी सापडण्याची आशा निर्माण झाली.

8 जूनपर्यंत सोनमचा पत्ता लागला नाही, त्यानंतर तिने तिच्या भावाला फोन केला आणि त्यानंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी तिला घेऊन गेले.

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

**"सुभेदारी शासकीय विश्रामगृह – शासनाची कोट्यवधींची शान, पण व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे सध्या दुर्दशेची शोकांतिका!"**




फुटक्या भिंती, तुटलेले नळ, कचऱ्याचे ढीग, दारूच्या बाटल्या आणि तंबाखूच्या रंगवलेल्या भिंती

"दैनिक युवक **आधारच्या 'दृश्य सत्यः लोकांच्या नजरेतून शासनाच्या दरबारात'** या उपक्रमातून आम्ही हा प्रश्न शासनाच्या दारात पोहोचवतो आहोत. प्रशासनाने स्वतः लक्ष देऊन स्वच्छतेसाठी पावले उचलावीत, हे ठिकाण पुन्हा त्याच्या वैभवात नांदावं हीच मागणी!"

छ. संभाजीनगर शहरातील सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची काळजी घ्या – कारण हे केवळ वास्तू नाही, आपल्या छत्रपती संभाजीनगर शहराची शान आहे!

– आसाराम विरकर, उपसंपादक, दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती

"जनतेच्या नजरेतून – सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची शान वाचवा!"

**"व्हीआयपी वास्तू, पण दुर्दशेची छाया – प्रशासन लक्ष देणार का?"**
**"स्वच्छतेसाठी आवाज – सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची हाक!"**

## शेतकरी स्वावलंबी होण्यासाठी खास उपाययोजना हवी;आ सदाभाऊ खोत

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**
**शिरूरआनंतपाळ**

: सरकार शेतकऱ्यांना स्वंयपुर्ण करण्यासाठी विविध योजना राबवीत आहे. तरीरी राज्यातील अनेक सुशिक्षीत युवक शेतीकडे वळताना दिसत नाहीत. कारण शेती उत्पादनातुन शेतकऱ्यांना हवा तसा मोबदला मिळत नाही. म्हणुन मागील आठ दहा वर्षापासुन शेतकऱ्याची मुल शेती करणे सोडले असुन मोठ्या शहरात लागल ती काम करत आहेत. यासाठी सरकारने शेतकऱ्यासाठी कायमस्वरुपी खास उपाययोजना आखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन माजी पणन व कृषी मंत्री आ.सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले. येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील नाथ मंदिरात रयत क्रांती संघठणेची नवीन शाखा व शेतकरी मार्गदर्शन मेळावा आयोजीत केला होता त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना आ.सदाभाऊ खोत म्हणाले की, शेतकऱ्यांना शेती करतांना अनेक आडचणीना सामोरे जावे लागत आहे.यात निर्सगाकडुन वेळोवेळी होणारी हानी, हरण, रान डुक्कराकडुन याकडून होणारी पिकाची नासधुस तर कधी परतीचा पाऊस यामूळे हाती आलेला घास हिरावून घेत असल्यामूळे शेतकरी व शेतकऱ्यांची मुले शेतीकडे पाठ फिरवताना दिसत आहेत. यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारने कायमस्वरुपी ठोस पावली उचलावीत या साठी मी आवाज उठविणार असल्याचे सांगितले. यावेळी महिला शेतकरी निता कुलकर्णी महिला बचत गटातील महिलांना शेती विषयक जाग्रती करण्यासाठी प्रचार व महिला बचत गट तयार करुन बॅंके मार्फत अर्थसाहाय्य मिळवुन देणाऱ्या सौ. सीमा सत्पुरे, नंदा वाघमारे यांचा आ.सदाभाऊ खोत यांनी सत्कार केला. यावेळी दैठना,डिगोळ, सुमठाना, पांढरवाडी, हानमंतवाडी, बोळेगाव, नागेवाडी, कारेवाडी शिरूरआनंतपाळ व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक बाबुराव वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रयत क्रांती संघठणेचे मराठवाडा प्रमुख शिवाजी पेटे यांनी मानले.




## आता एका 'मेसेज'वर सुटणार दिग्रसकरांची समस्या तक्रारीसाठी व्हाटसअ‍ॅप क्रमांक उपलब्ध

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

दिग्रस शहरातील नागरिकांना आपल्या समस्या आणि तक्रारी आता घरबसल्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचवता येणार आहेत. दिग्रस नगरपरिषदेने तक्रार निवारणासाठी एक विशेष व्हॉट्सॲप क्रमांक (९६०७४१८८४२३) लॉंच केला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार असून, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे. उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल आणि नगरपरिषद मुख्याधिकारी अतुल पंत यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभकरण्यात आला. हा व्हॉट्सअप क्रमांक ७ जूनपासून नागरिकांच्या सेवेसाठी कार्यान्वित होईल. पूर्वी, शहरातील विविध प्रभागांतील नागरिकांना आपल्या तक्रारी घेऊन नगरपरिषदेत हेलपाटे मारावे लागत होते, ज्यात वेळ वाया जात असे आणि तक्रार निवारणाची शाश्वतीही नसायची. आता, मात्र या आधुनिक सुविधेमुळे नागरिक पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, विद्युत, बाजार विभाग किंवा इतर कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या फोटो किंवा मेसेजद्वारे या क्रमांकावर पाठवू शकतील. प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवल्या जातील. विशेष म्हणजे, या तक्रारींचे निवारण झाले की नाही आणि तक्रारकर्त्यांचे समाधान झाले का, याची चाचपणी खुद्द मुख्याधिकारी अतुल पंत करणार आहेत. त्यांच्या या थेट नियंत्रणामुळेअधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कामाचा वचक राहणार आहे. नगरपरिषदेच्या या विधायक उपक्रमामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. या शुभारंभ कार्यक्रमाला नगरपरिषदेचे विविध विभागप्रमुख, कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

## "फोटोतून उठलेला आवाज"

**फोटोतून आवाजः जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात**

फोटोतून झळकतात जखमा,
स्वच्छतेच्या अभावाने खोलवर साठलेल्या,
कचऱ्याच्या ढिगाऱ्यात हरवलेलं वैभव,
तंबाखू नि गुटक्यांच्या पिचकाऱ्याने रंगलेल्या भिंती,
आणि दारूच्या बाटल्यांतून उमटणारी बेवारस कुजबुज.
जनतेच्या नजरेतून – आम्ही मांडतोय प्रश्न,
फोटोतून आवाज – थेट शासनाच्या दरबारात!
स्वच्छ भारताच्या स्वप्नाला इथं झाकलंय धुळीत,
तुटलेले नळ, पडलेली भिंत – 'कोण घ्यायचं लक्ष?' विचारतोय आम्ही.
कोट्यवधी रुपयांची मालकी, पण व्यवस्थापन बेपत्ता,
हा आवाज नुसता हळवा नाही – हा आवाज पेटलेला,
स्वच्छतेच्या नव्या युगाची हाक देणारा!
फोटोतून आवाज, आता केवळ चित्र नाही –
तोच जनता बनून शासनाला जागवणारा!
उठा, प्रशासनांनो – स्वच्छतेची शपथ पुन्हा घ्या,
सुभेदारीला पुन्हा स्वच्छतेचं वैभव द्या!
कारण इथे फक्त वास्तू नाही –
तर आपल्या शहराचा आत्मा आहे!
– आसाराम विरकर
**उपसंपादक, दैनिक युवक आधार**

## कलगी-तुरा समाज उन्नती समन्वय समितीची सभा चिपळूण येथे संपन्न

### शाहीरांनी लोककलेची अस्मिता टिकवण काळाची गरज-अभयदादा सहस्त्रबुद्धे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - ( केतन भोज )**

कलगीतुरा समाज उन्नती मंडळ समन्वय समितीची विशेष सभा रविवार दि.०८ जून २०२५ रोजी समितीचे अध्यक्ष अभयदादा सहस्त्रबुद्धे यांच्या परशुराम( चिपळूण) येथील निवासस्थानी यशस्वीरित्या संपन्न झाली.समन्वय समितीशी सलग्न मंडळाच्या सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी यावेळी उपस्थिती दर्शवली आणि सभेला अनुसरून सांगोपांग चर्चा करण्यात आली. कलगीतुरा या आपल्या वैभवशाली परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रत्येक शाहिराने आपल्या पारंपरिक चौकटीला छेद न देता आपली कला सादर करून या लोककलेचा लौकिक अधिक वाढेल यादृष्टीने प्रयत्न करणे अभिप्रेत आहे. सभेदरम्यान समन्वय समिती व मंडळाची ध्येयधोरणे आपण तंतोतंत पाळू असा



लिखित शब्द देऊनही काही शाहीर स्वतःच्याच वचनाला बांधील न राहता या लोककलेच्या संस्कृतीशी प्रतारणा करताना निदर्शनास येत आहे,त्यांना वारंवार समज देऊनही अपेक्षित बदल दिसत नाही,त्यामुळे संबंधित शाहिरांवर कायम स्वरूपाची व ठोस कारवाई करण्यात यावी असा निर्णय समन्वय समितीच्या माध्यमातून घेण्यात आला.या लोककलेला शासन दरबारी न्याय मिळावा यासाठी समन्वय समिती व सलग्न सर्व मंडळे तसेच संबंधित पदाधिकारी सातत्याने पाठपुरावा करत आहेत,शासनाने आपल्या पदरात अपेक्षित अनुदान टाकावे यासाठी शासनाला अभिप्रेत असणारी लोककला सादर करणे आवश्यक आहे,पर्यायाने त्यासाठी काही तांत्रिक बदल करण्याची देखील गरज असल्याचे सभे दरम्यान नमूद करण्यात आले.उदाहरणार्थ आपल्या लोककलेचा उगम हा "कलगी – तुरा" या नावाने झाला आहे आणि त्यानुसार स्थापन झालेली आपली मंडळे ही "कलगीतुरा समाज उन्नती मंडळ" या नावानेच नोंदणीकृत आहेत.शासनाच्या निकषानुसार कलगीतुरा याच नावाने या लोककलेचा प्रचार आणि प्रसार होणे गरजेचे आहे. आजवर आपण "शक्ती तुरा"अशा आशयाने या लोककलेशी निगडीत जाहिरात करत आलो आहोत.परंतु यापुढे "शक्ती तुरा" याऐवजी "कलगीतुरा" असा उल्लेख असणारी प्रचार फलक तयार करण्यात यावेत आणि तसाच उल्लेख आपल्या बोलण्यातून सुद्धा व्हावा अशी भूमिका आजच्या सभेत मांडण्यात आली आणि ती सर्वानुमते मान्य करण्यात आली. या लोककलेच्या समृद्धीसाठी आवश्यक ते चांगले बदल करण्यासाठी आपण प्रत्येक कलावंत सदैव बांधील आहोत आणि राहिले पाहिजे.सभेमध्ये येणाऱ्या हंगामात सोज्वळ आणि समाजप्रिय कार्यक्रम सादर व्हावेत,शाहिरांनी आपल्या लोककलेची आणि स्वतःची अस्मिता अबाधित ठेवून सादरीकरण करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.आणि संबंधित मंडळांनी व घराण्यातील वरिष्ठांनी आपापल्या शाहिरांना सूचना द्याव्यात असेही यावेळी सुचवण्यात आले. सदर सभेसाठी समन्वय समितीचे विद्यमान अध्यक्ष अभयदादा सहस्त्रबुद्धे,सचिव सुधाकर मास्कर,उपाध्यक्ष चंद्रकांत गोताड,मोहन घडशी,मुंबई मंडळाचे अध्यक्ष अनंत तांबे समवेत इतर पदाधिकारी,देवरुख मंडळाचे अध्यक्ष शांताराम मालप आणि पदाधिकारी,चिपळूण मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग जंगम आणि पदाधिकारी तसेच लांजा मंडळाचे सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते.सभेचे सूत्रसंचालन शाहीर शाहिद खेरटकर यांनी केले.



**दैनिक युवक आधार -** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने कामोठे येथील सुभाष लक्ष्मण कांबळे व पनवेलमधील रमेश बाबुराव चक्रे यांना पुरस्कार जाहीर झाला असून त्यांना मंगळवार दिनांक १० जून रोजी मुंबईतील नरिमन पॉईंट येथे होणाऱ्या समारंभात सन्मानित करण्यात येणार आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, व इतर मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

## नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजप कटिबद्ध -माजी सभागृहनेते परेश ठाकूर

दैनिक युवक आधार
पनवेल(प्रतिनिधी)

पायाभूत सुविधांचा दर्जा वाढवून नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध आहे, अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून नवीन पनवेलमध्ये उभारण्यात आलेल्या सामाजिक सभागृहाच्या उद्‌घाटनावेळी ते बोलत होते.



पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा विकासनिधी आणि महापालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल सेक्टर 16, प्लॉट नंबर 3 येथील गार्डनमध्ये सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहे. माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून 19 लाख 11 हजार रुपये खर्चाचे हे काम पूर्ण झाले आहे. या सभागृहाचे उद्‌घाटन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, अजय बहिरा, सुनील बहिरा, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, ॲड. वृषाली वाघमारे, प्रिती जॉर्ज, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, अर्चित घरत, चंद्रकांत म्हात्रे, मनोज म्हात्रे, रघुनाथ बहिरा, सुजाता पाटील, सरोज मोरे, प्रभा सिन्हा, सोनाली कुदळे, सरिता पाटील, शिवानी रावते, मितेश ठाकूर, किशोर मोरे, कमलाकर घरत, विवेक पाटील, डॉ. शुभदा नील उपस्थित होते. या वेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी या सभागृहाचे काम चांगल्या दर्जाचे झाले असल्याचे गौरवोद्‌गार काढून चारुशीला घरत यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून खारघर येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे कैवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून खारघर भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा आणि खारघरचा राजा मंडळाच्या वतीने खारघर येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सत्कार, ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून साहित्याचे वाटप केले आणि कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी नुकतीच वयाची वर्षे पूर्ण केली असून, त्यांनी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने खारघर शहरातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले, तर गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, खारघरचा राजा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजय पाटील, वनिता पाटील, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष मितेश पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## सिल्लोड येथे श्री कालिंका देवीचा 28 वा प्राणप्रतिष्ठा दिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** येथील टिळक नगर भागातील श्री कालिंका माता मंदिर येथील श्री कालिंका देवीचा 28 वा प्राणप्रतिष्ठा दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. श्री कालिंका देवीचा 28 वा प्राणप्रतिष्ठा दिन सोहळा निमित्त सिल्लोड शहरात भव्य पालखी मिरवणुक व मंदिर परिसरात महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार अब्दुल सत्तार आयोजित पालखी मिरवणुकीत सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधत श्री कालिंका देवीचा 28 वा प्राणप्रतिष्ठा दिन सोहळा निमित्त शुभेच्छा दिल्या.प्रसंगी कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, शिवसेना तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे , नॅशनल सह. सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, रवी गायकवाड यांच्यासह प्रकाश घरमोडे अध्यक्ष, संजय पोफळे ,अजय माहूरकर ,शरद भांडेकर ,वामन शेठ मुळे ,गोपाळ शेठ अन्वीकर ,मनोज वडगावकर ,रवी रासने ,शाम सरोदे ,पंकज तांबट ,गजानन तांबट, राजेश निंबाळकर ,बापु वाघ, बापू मुळे, दीपक घरमोडे, मारुती पोफळे, गजानन निंबाळकर, सुभाष वडगावकर, शरद वडगावकर ,योगेश वडगावकर, दत्ता देखणे , संतोष रासने आदिंसह भविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## पैठण येथे प्रधान मंत्री आवास २.० योजना (शहर) विभाग आ.भुमरे यांच्या हस्ते शुभारंभ.

**दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा विभाग)**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण नगर परिषद हद्दीतील बेघर,गोरगरीब तसेच घरविरहीत असलेल्या सर्व नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना २.० शहरी विभाग अंतर्गत येणाऱ्या सर्व नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळणार आहे. या योजनेत पात्र असलेल्या नागरिकांना घरकुल बांधकामासाठी सरकारकडून २.५ ० लाखांचे अनुदान देण्यात येणार आहे तसेच योजनेपासून कोणताही नागरीक वंचित राहणार नाही असे आश्वासनं या योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमा प्रसंगी आमदार विलास पा.भुमरे यांनी दिले.सदरिल कार्यक्रम पैठण नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विलास बापू भुमरे यांच्या हस्ते संपन्न झाला. पैठण शहरातील बेघर गोरगरीब नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी विभाग) घरकुल योजनेची मोठी घोषणा करण्यात आली असून कोणताही पात्र नागरिक या योजनेपासून वंचित राहणार नसल्याचे सांगून सदरील योजना ही प्रभावीपने राबवत कुठलाही लाभार्थी



वंचित राहिला नाही याची दक्षता घ्यावी असे सक्त निर्देश या योजनेच्या शुभारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमा दरम्यान आ.विलास बापू भुमरे यांनी दिले.यावेळी मा.नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, सुरज लोळगे मा. नगरसेवक अजित पगारे,जालिंदर आडसुळ, सुनील बलदवा,मा.उपाध्यक्ष सुचित्रा जोशी,संदिप आहेर,प्रशांत जगदाळे, कृष्णा मापारी, इश्वर दगडे,तुषार पाटील, सोमनाथ परळकर,भुषण कावसनकर,बाळासाहेब माने, पैठण नगरपरिषद उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे, धर्मराज उजगरे,अश्विन गोजरे,युवराज हलमारे, महेश गायकवाड,तुषार वाकळे यांच्यासह संकेत तांगडे,प्रशांत लांडे, गावंडे, चंद्रकांत पगारे,अशोक मगरे, रेशमा साबळे, निता ठोके, पंकज पवार, नवनाथ जगधने, राजु पगारे अदिंसह नगर परिषद हद्दीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शेत तळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोन सख्या चुलत भावांचा पाण्यात बुडून मृत्यु.
### पैठण तालुक्यातील आगलावे गेवराई येथील दुदैवी घटनेने खळबळ.

**दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा विभाग)**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



पैठण तालुक्यातील आगलावे गेवराई येथे दि.८/६/२०२८ वार रविवार रोजी दुपारी दोन सख्येचुलत भाऊ शेत तळ्यात पोहण्यासाठी गेले असता त्यांचा पाण्यात बुडून मृत्यु झाला,सतिष एकनाथ आगळे (वय १६) वर्ष व गौरव शिवाजी आगळे (वय १८) वर्ष रा.गेवराई बु, ता.पैठण अशी त्यांचे नावे आहेत.या बाबत अधिक माहीती अशी आहे की,आगलावे गेवराई परिसरातील होणाबाचीवाडी शिवारातील एकनाथ आगळे यांच्या शेतातील शेत तळ्यात दि.८ जुन २०२५ रोजी दुपारी गेवराई बु, येथील दोन सख्ये चुलत भाऊ सतिष आणि गौरव हे दोघे पोहण्यासाठी गेले होते.परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने या दोघांचा पाण्यात बुडून मृत्यु झाला.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.नातेवाईकांनी नागरीकांच्या मदतीने दोघांना शेत तळ्यातुन बाहेर काढून त्यांना तात्काळ आडूळ येथील शासकीय रुग्णालयात नेले असता,परंतु तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासुन दोघांना मृत घोषित केले.आडूळ येथील रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.या प्रकरणी पाचोडपोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन पंडीत यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.मृत सतिष आगळे हा पदवीच्या पहील्या वर्षाच शिकत आहे तर गौरव आगळे हा दहावी उत्तीर्ण झाला आहे.या दुदैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यत्त केली जात आहे.

## पिंपळा येथील शेतकरी बांधवांना तालुका कृषी अधिकारी देवकर साहेब यांनी केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

जिल्हा परिषद शाळा पिंपळा येथील प्रांगणात 6 मे रोजी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन 2025/26 अंतर्गत देवकर साहेब तालुका कृषी अधिकारी मालेगाव यांच्या मार्गदर्शनात एक मोठा प्रचार ,प्रसार व ओरिएटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाचा उद्देश नैसर्गिक शेती पद्धतीना प्रोत्साहन देणे तसेच कृषी विभागाच्या विविध उपक्रमाची माहिती देणे हा होता.या कार्यक्रमात स्थानिक शेतकरी प्रतिष्ठित नागरिक महिला व कृषी विभागातील अधिकारी यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक कृषी अधिकारीझजी.इडोळे उपक्रोशी अधिकारी जी.डी मालस,सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापन विजय एस.दुधे मंडळ कृषी अधिकारी तांबे सर, व,कृषी सखी सौ.लक्ष्मी सुधाकर धोंगडे,कल्पना दिलीप वानखडे यांची उपस्थिती व सहभागी करण्यात आले या कार्यक्रमाचे बीजप्रक्रिया नैसर्गिक शेती पद्धती व टिकाऊ शेती संबंधी माहिती देण्यात आली.स्थानिक शेतकऱ्यांना जागरूकता व प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यशस्वी कार्यक्रमासाठी आयोजकांनी उपस्थितीचे कौतुक केले असून भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांना चालना देण्याचा निर्णय घेतला आहे.





**दैनिक युवक आधार -** स्वराज्य प्रतिष्ठान तर्फे पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. या पुरस्कार सोहळ्यामध्ये डॉक्टर तात्या लहाने यांच्यातर्फे दैनिक युवा आधार चे मुंबई संपादक माननीय श्री किशोर घोडेकर जी यांना महाराष्ट्र महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. मुंबई मधून किशोर गुडेकर यांचे सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन वर होत आहे.

## तहसील कार्यालयाच्या समोरील रस्त्यात उंच वाढलेली धोकादायक झाडे तोडण्यात यावी.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजितसिह. ठाकूर**

रिसोड शहरातील मुख्य वर्दळीच्या रस्त्यावरील व तहसील कार्यालयासमोरील रस्त्याच्या दुतर्फा बकुळीची तीन झाडे असून ती स्वामी विवेकानंद वाचनालयासमोर, तहसील कार्यालयाच्या गेट समोर, व मेहता इंटरनेट कॅफेच्या समोर हि तीन झाडे उंच वाढलेली असून ही झाडे वादळी हवेमुळे केव्हाही उन्मळून कोसळू शकतात. व मेहता इंटरनेट कॅफेच्या समोर असलेल्या झाडांमधून विद्युत वाहिनीचे तार गेल्याने हवेमुळे झाड मोडल्यास तार तुटू शकतात. त्यामुळे येथे अपघातही होऊ शकतात. रस्त्यावर लहान मुले खेळतात. तुटलेले झाड राहत्या घरावरही पडू शकते!, हा रस्ता खूपच वर्दळीचा असून या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागात येणारे लोक/ कर्मचारी, तहसील मध्ये येणारी सामान्य



जनता व तहसीलचे कर्मचारी आणि या रस्त्यावर बरेचसे नागरी सेवा सुविधा सेतू आहेत त्यासाठी शेतकऱ्यांची वर्दळ या रस्त्यावर नेहमीच असते. म्हणूनच या धोकादायक झाडाची पाहणी करून तात्काळ ही झाडे पाडावी अन्यथा कधीही घटना घडल्यास यामुळे कुणाचाही जीव जाऊ शकतो. या बकुळीचे झाड उन्हाळून पडल्याच्या नंतर कोणाचाही जीव गेला तर ती पोकळी कधीच भरून निघणार नाही. याबाबतची काळजी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी घ्यावी. अशा आशयाचे निवेदन कमलाकर रामचंद्र टेंभरे वय वर्ष ८७ यांनी दिनांक ८ मे रोजी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना दिले आहे. सोबतच विधान परिषदेच्या आमदार भावनाताई गवळी, जिल्हाधिकारी वाशिम, तहसीलदार रिसोड, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम, उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग रिसोड यांना माहितीस्तव निवेदन देण्यात आले आहे. आजपर्यंत निवेदन देऊन कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, तरी या निवेदनाची दखल घ्यावी अशी अपेक्षा ज्येष्ठ वयोवृद्ध कमलाकर टेंभरे यांनी केली आहे.

## कोकण म्हाडा मा.सभापती बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रंगला पैठणीचा न्यू होम मिनिस्टर खेळ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**


कोकण म्हाडाचे मा. सभापती बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त, महिला सक्षमीकरण, मनोरंजन आणि सन्मान यांचा सुंदर संगम ठरणारा 'न्यू होम मिनिस्टर' हा विशेष कार्यक्रम पार खारघर येथे पार पडला आहे. घर आणि समाज या दोन्ही आघाड्यांवर आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या मातृशक्तीच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गृहिणींना त्यांची नेतृत्वक्षमता, संवादकौशल्य आणि विनोदबुद्धी दाखवण्याची संधी मिळाली. यावेळी विशेष उपस्थितीत म्हणून सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री सौ.शिवानी सुर्वे ('देवयानी', 'फुलवा' मालिका आणि 'ट्रिपल सीट' चित्रपट फेम), सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री सौ.मेघा धाडे (2018: बिग बॉस मराठी विजेती), सुप्रसिद्ध सिने-अभिनेता - क्रांती नाना माळेगावकर (न्यू होम मिनिस्ट्रर खेळ पैठणीचा) तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आ.विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस श्रीमती.माधवीताई नाईक, रायगड भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, मा.नगरसेवक सौ.नेत्रा पाटील, ब्रिजेश पटेल, सौ.साधना पवार, संयोजक नगरसेवक समीर कदम मित्र परिवार, उदय पाटील मित्र परिवार, विक्रांत दादा पाटील प्रतिष्ठान पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महिला वर्गाच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि सकारात्मक प्रतिसादाने कार्यक्रमात एक वेगळीच ऊर्जा संचारली. महिला भगिनींनी ज्या उत्साहाने विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला, आपली कला, नेतृत्व आणि संवादकौशल्य दाखवले, ते खरंच प्रेरणादायी ठरले, असल्याचे मत आ.विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले.



## राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र संघाला द्वितीय पारितोषिक

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

**नाशिक ;-** टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ६ वी राष्ट्रीय सिनियर टेनिस क्रिकेट स्पर्धा पानिपत क्रीडा संकुलन, हरियाणा (पानिपत ) येथे उत्साहात संपन्न झाली. यामध्ये हरियाणा संघाला सुवर्णपदक ,द्वितीय क्रमांक महाराष्ट्र व तृतीय क्रमांक मध्य प्रदेश,चौथा क्रमांक मुंबई , संघाला मिळाल्याबद्दल या सर्व खेळाडूंचे राज्यातून अभिनंदन होत आहे या स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर, राष्ट्रीय महासचिव मीनाक्षी गिरी ,हरियाणा सचिव कश्मीर सिंग,टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया उपाध्यक्ष पंकज सावंत आदि मान्यवरउपस्थित होते. या टूर्नामेंटमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणारे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर उपस्थित



राहतील, या टूर्नामेंटची दोन टीम तयार होईल, जो पोलँड आणि रशियामध्ये सहभागी होईल तसेच ड्रीम लीग ऑफ इंडिया या लीग मध्ये खेळाडूंना संधी मिळणार आहे अशी माहिती आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर यांनी सांगितले. तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे महासचिव मीनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल माहिती व त्याचे महत्त्व सांगितले. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून मुलांचे १२ संघ उपस्थित होते. टेनिस क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना हरियाणा विरुद्ध महाराष्ट्र असा झाला. यामध्ये हरियाणा च्या खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे नेत्रदीपक कामगिरी करत संघाला विजयश्री मिळवून दिला.परंतु, महाराष्ट्र संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले , तृतीय क्रमांक मध्यप्रदेश चौथा क्रमांक मुंबई संघाला मिळाल्याबद्दल महाराष्ट्र टेनिस क्रिकेटच्या सचिव मिनाक्षी गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेटचे उपाध्यक्ष विलास गिरी ,संदीप पाटील, सिद्धेश गुरव, महेंद्र देशमुख , महाराष्ट्र महिला ,अध्यक्ष धनश्री गिरी ,नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी अभिनंदन केले व आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## रिसोड येथील सर्पमित्राने दिले सापाला जीवदान.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर -**

रिसोड...-पृथ्वीवर जन्मलेल्या अति सूक्ष्म किटकापासुन तर विशालकाय प्राण्यांना नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत जगण्याचा अधिकार आहे.7 जुन मृग नक्षत्रापासुन पावसाळा ऋतू सुरू होताचं घोरपड तसेचं विविध रंग-रूप धारण केलेल्या विविध सापांचे दर्शन मानवाला होत असते.हि एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. साप दिसताक्षणी अनेकांच्या काळजाचे ठोके चुकायला सुरूवात होते .पण आढळुन येणारे सर्वच साप विषारी असतात का ?तर नाही.हि केवळ मानवाची एक भ्रमिष्ट धारणा आहे.महाराष्ट्रामध्ये आढळणार्या 32 हजार सापांच्या जातींपैकी केवळ नाग,मण्यार,घोणस व फुरसे हे चार प्रकारचे साप विषारी तर बाकी सर्व बिनविषारी साप असतात ह्यात तिळमात्र शंका नाही.पण साप दिसता क्षणी त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला जातो नव्हे तर त्याला मारतात हे कितपत योग्य आहे,असे वक्तव्य वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी रिसोड स्थित जगन्नाथ मुलंगे ह्यांच्या घरून सर्पमित्रांनी पकडलेल्या जीवंत सापांच्या घटने दरम्यान व्यक्त केले., रिसोड येथे सद्धस्थितीत अनंता देशमुख,सोनु गिते,रामेश्वर गवळी,श्याम भाऊ तिवारी तसेचं त्यांचे सहकारी संतोष गांगवे सर्प मित्राचे कर्तव्य उत्कृष्टपणे पार पाडत आहेत हि रिसोडकरा साठी जमेची बाजू आहे. आतापर्यंत त्यांनी अनेक लहान मोठ्या विषारी तसेच बिनविषारी सापांना पकडुन जंगलामध्ये सुरक्षितपणे नेऊन सोडण्याचे कौतुकास्पद कार्य केले आहे. ह्या प्रसंगी सर्पमित्रांनी कथन केल्याप्रमाणे जेव्हा अनेक



हिंदू धर्मीय लोकांच्या घरी साप आढळुन येतो तेव्हा एकतर त्याच्या जवळ जाण्याची अनेकांची हिम्मत होत नाही दुसरी बाब म्हणजे त्याला मारण्याकरीता मन सुध्दा धजावत नाही. मनुष्य एका गंभीर धर्म संकटात अडकतो.अश्यावेळी कोणत्याही प्रकारचा गोंगाट न करता शांतपणे सर्पमित्रांना फोन करावा कारण साप आहे त्या ठिकाणी दिर्घकाळ थांबु शकतो याऊलट धावपळ केल्याने मनुष्य पावलांनी जमीनीवर निर्माण होणार्या तरंगाची जाण त्यांना होते त्याक्षणी ते जलदगतीने स्थलांतरीत होऊ शकतात ,हे तेवढेच खरे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेता आपणही दक्षता म्हणुन कमीत-कमी तीन -चार सर्प मित्राचे फोन नंबर स्वतःजवळ बाळगावे अशी विनंती वजा सुचना मुलंगे ह्यांनी उपस्थितांना केली.

## सिल्लोड येथील अब्दुल हमीद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** दि.६ जून २०२५ छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या गौरवशाली दिवशी, अब्दुल हमीद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिल्लोड येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श, दूरदृष्टी, प्रशासनिक कौशल्य आणि स्वराज्य स्थापनेतील योगदानाची आठवण या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा आणि राष्ट्रीय अभिमान वृद्धिंगत करण्याचा उद्देश यामागे होता. कार्यक्रमाचे ऑनलाईन व्हिडिओद्वारे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.



या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना श्री. मंगल प्रभात लोढा, मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग ह्यांची होती. त्यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शनाने कार्यक्रमात ऐतिहासिक भव्यता आणि सांस्कृतिक प्रेरणा निर्माण झाली. संस्थेचे प्राचार्य श्री के.बी. ठाकूर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना "शिवराज्याभिषेक हा केवळ एक सोहळा नव्हता तो प्रत्येक सामान्य माणसाला स्वाभिमान देणारा एक सामाजिक निश्चय होता. आज आपणही तसाच निश्चय आपल्या मनाशी करायला हवा , की आपण स्वतः आत्मनिर्भर होऊन आपल्या कौशल्याचा उपयोग समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी करू" असा संदेश उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून शेखर मांडे, सपकाळ सर, गीते सर,आव्हारे सर, सावंत सर उपस्थित होते"शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व आणि आजच्या काळातील त्याची प्रेरणा"पंच परिवर्तन या अंतर्गत नागरिक कर्तव्य व शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन स्वदेशी विचारांचा स्वीकार, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण या विषयावर सखोलमार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य ही केतन कुलकर्णी तसेच साई सॉफ्ट कॉम्पुटर या संस्थेचे संचालक विजय खाजेकर ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल कारेकर यांनी व आभार श्री भंडारे सर यांनी केले. प्रसंगी संस्थेतील कर्मचारी, विद्यार्थ्यांसह माजी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने हजर होते कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संस्थेचे सर्व शिल्प निदेशक, सर्व कर्मचारी ह्यांनी परिश्रम घेतले.

## नर्मदा सॉल्वेक्स प्रा. लि यांनी घेतले 75 क्षयरुग्ण दत्तक.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड.तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

**वाशिम :** दिनांक 06/06/25 रोजी वाशीम येथील नर्मदा सॉल्वेक्स प्रा. लि अण्ड काळुराम फूड प्रा. लि.चे संचालक श्री. संजयजी रुहाटिया यांनी 75 क्षयरुग्ण निक्षयमित्र या शासनाच्या संकल्पनेअंतर्गत दत्तक घेतले असून त्या सर्वांना प्रोटीन पावडरचे वाटप करण्यात आले. यापुढेही असेच सहकार्य करणार असे संचालक यांनी सांगितले. यावेळी उपस्थित कमर्शीयल मॅनेजर नितेश एकघरे, एच आर शहाजी सोनुने, रवींद्र शर्मा, अनिल सोमाणी तसेच जिल्हा क्षयरोग केंद्राचे कार्यक्रम व्यवस्थापक समाधान लोणसूने, उपचार पर्यवेक्षक रामेश्वर



सोनुने,मंगेश पिंपरकर, आरोग्य निरीक्षक रामदास गवई उपस्थित होते.'निनिक्ष्य मित्र' ही संकल्पना क्षयरोग (टीबी) रुग्णांच्या उपचारात आणि मानसिक आधारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारत सरकारच्या राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (NTEP – NATIONAL TUBERCULOSIS ELIMINATION PROGRAMME) अंतर्गत ही योजना राबवली जाते. 'निनिक्ष्य मित्र' ही योजना केवळ आरोग्य सेवा न देता मानवी संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि सहकार्याचे मूर्त रूप आहे. अशा मित्रांमुळे अनेक टीबी रुग्ण पूर्णपणे बरे होऊन पुन्हा आपल्या जीवनात आनंदाने सहभागी होतात. प्रत्येक व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा समाजसेवी संघटना 'निक्षय मित्र' होऊ शकते.यामार्फत आपण एका रुग्णाचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतो. जिल्ह्यातील दानशूर, समाजसेवक यांनी निक्षय मित्र बनावे यासाठी जिल्हा क्षयरोग केंद्राच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## शेतकरी नेते कवळे गुरुजी यांची भायेगाव ता उमरी हणमंते परिवारास सांत्वन पर भेट.

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

**नांदेड -** उमरी हरवलेलं छत्राची आई बनली व्हीपीके पतसंस्था वारस मुलाला दत्तक घेऊन शैक्षणिक खर्चाची घेतली जबाबदारी तसेच व्याही महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. ना. मकरंद आबा पाटील यांना दूरध्वनी वरून संपर्क करून जिल्हाधिकारी नांदेड व उमरी तहसीलदार प्रशान्त थोरात यांना तात्काळ मदत करण्यात यावी अशी मागणी केली व्हीपीके पतसंस्था ही सामाजिक बांधिलकी जोपासात त्वरित मदत करण्यासाठी नेहमी तत्पर राहते. गोदावरी नदीपात्रात कपडे धुण्यासाठी गेलेल्या मायलेकींसह पुतणीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना तालुक्यातील भायेगाव येथे शनिवारी दुपारी घडली. महानंदा भगवान हणमंते वय ३५ पायल भगवान हणमंते १३ ऐश्वर्या मालू हणमंते १३ अशी मृतांची नावे आहेत. महानंदा दोघींना घेऊन कपडे धुण्यासाठी नदीवर गेली होती. कपडे धूत असताना बाजूला पाण्यात खेळत असलेली पायल खड्यात बुडायला लागली. आई महानंदाने तिला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघीही पाण्यात बुडाल्या. यावेळी ऐश्वर्या या दोघींचा हात धरायला गेली. तर तीही पाण्यात बुडाली.ही बातमी समजताच व्हीपीके पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी तात्काळ सांत्वन पर भेट देऊन वारस मुलाला दत्तक घेतले यावेळी गावातील जेष्ठ आनंदराव पाटील कदम, मधुकर पाटील बोलसेकर, बापूराव पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील कदम पतसंस्थेचे सचिव नागनाथ पांचाळ, गोविंदराव पाटील राहटीकर, भगवान कोकणे, मारोतराव सर्जे, सह गावातील ग्रामस्थ उपस्थित होत



# चिपळूण नागरी तर्फे ९ जून रोजी संकल्प मेळावा व सहकार कार्यशाळा

## मिशन २०२६ चे उद्दिष्ट सभासदांसमोर ठेवले जाणार!

दैनिक युवक आधार
**चिपळूण (प्रतिनिधी):** - चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे सोमवार दिनांक ९ जून रोजी सकाळी १० वाजता चिपळूण बहादूरशेख नाका येथे संस्थेच्या 'सहकार भवन' सभागृहात संकल्प मेळावा व सहकार कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तर या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त व आयुक्त तथा सहसचिव सहकार व पणन वस्त्रोद्योग मंत्रालय मुंबईचे एस. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या संकल्प मेळाव्यात संस्थेतर्फे 'मिशन २०२६" चे उद्दिष्ट ठेवले जाणार असल्याची माहिती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना प्रशांत यादव यांनी दिली. चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेची संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली




यशस्वी वाटचाल सुरू आहे. आर्थिक व्यवसायिकता सांभाळीत असतानाच गरजू, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना व्यवसायासाठी सुलभ पद्धतीने कर्ज पुरवठा केला जातो. इतकेच नव्हे तर ठेवींवर देखील योग्य व्याज दर दिला जात आहे. तर सामाजिक बांधिलकी देखील तितकीच जपली जात आहे. चिपळूण नागरीच्या ५० शाखांच्या माध्यमातून ३२ वर्षे आर्थिक व्यावसायिकता संभाळताना- पारदर्शक कारभार पाहताना दि. ३१ मार्च २०२५ सभासद संख्या १ लाख ४६ हजार ६८२, भाग भांडवल ७६ कोटी ३७ लाख (एवढे मोठी भागभांडवल असणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था), स्वनिधी १६१ कोटी ५४ लाख, ठेवी ११३२ कोटी १२ लाख, कर्जे ९८३ कोटी ३३ लाख एकूण व्यवसाय २११५ कोटी ४५ लाख, गुंतवणुका २९० कोटी ४३ लाख, मालमत्ता ३९ कोटी ३० लाख, ढोबळ नफा ३९ कोटी २५ लाख रुपये इतका आहे. तसेच चिपळूण नागरीने सभासदांना बचतीची सवय लागावी यासाठी अनेक योजना सुरू केले आहेत. यामध्ये धनसिद्धी ठेव, श्री स्वामी समर्थ ठेव, सिद्धी ठेव, राष्ट्र अमृत महोत्सव ठेव, संकल्प ठेव, श्रावण मास ठेव, समृद्धी ठेव, गणेश ठेव, उत्कर्ष व धनसंचय ठेव या ठेव योजनेबरोबरच सुयश, अल्पमुदत, आवर्त, बचत, स्वावलंबी बचत, धनवर्धिनी, दाम दुप्पट, दाम तिप्पट या ठेव योजनांचा समावेश आहे. या योजनेत हजारो सभासद सहभागी झाले आहेत. ३२ वर्षाची चिपळूण नागरीची यशस्वी वाटचाल अखंड सुरू आहे. तर आता चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे सोमवार दिनांक ९ जून रोजी संकल्प मेळावा व सहकार कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या संकल्प मेळाव्यात संस्थेतर्फे मिशन २०२६ चे उद्दिष्ट सभासदांसमोर ठेवले जाणार आहे. यामध्ये ८० कोटी भाग भांडवल, ९५ कोटी निधी, १७५ कोटी एकूण स्वनिधी, १ हजार २२५ कोटी एकूण ठेवी, १ हजार ५० कोटी एकूण कर्जे, २ हजार २७५ कोटी एकूण व्यवसाय तर ५० कोटी एकूण नफाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांनी दिली. तरी या संकल्प मेळावा व कार्यशाळेला सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांनी केले आहे.

## कोरपावली येथील शेळी चारणाऱ्या तरूणाचा सांडपाण्याच्या खड्डयात चिखलात पडून दुदैवी मृत्यु.

दैनिक युवक आधार
जळगाव वार्ताहर



यावल तालुक्यातील कोरपावली येथील शेळ्या चालणाऱ्या तरुणाचा गावाला लागत असलेल्या नाल्यातील चिखलात शेळी वाचवण्यासाठी बुडून मृत्यू झाला याबाबत यावल पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे दिनांक आठ रोजी गावालगत असलेल्या नाल्या च्या काठावर सायंकाळी सात वाजेचे सुमारास जयेश संतोष महाजन वय 18 हा शेळ्या चारण्यासाठी गेला होता शेळ्याचारीत असताना त्यातील एका बकरीचा पाय घसरून ती नाल्यातील डबक्यात पडली तिला वाचवण्यासाठी त्याने प्रयत्न केले असता तो स्वतः सांड पाण्याच्या चिखलात बुडून मयत झाला जयेशला काढण्यासाठी गावकऱ्यांनी तातडीने प्रयत्न केले मात्र त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले जयेश जयशहा गरीब कुटुंबातील तरुण होता शेळ्या चारून तो आपला उदरनिर्वाह करीत होता त्याचे पक्षात दोन भाऊ वडील असा परिवार आहे याबाबतची खबर जयश्री काका विनोद काशिनाथ महाजन यांनी दिले वरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे पुढील तपास हवालदार वसीम तडवी हे करीत आहेत

## बकरी ईद निमित्त रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन

दैनिक युवक आधार
**पनवेल प्रतिनिधी** - ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त पनवेल मधील विविध सामाजिक संस्थांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीही रक्तदान शिबिराबरोबरच आरोग्य, नेत्र तपासणी शिबिराचे आयोजनही करण्यात आले होते. दारुल अमन ट्रस्ट च्या पुढाकाराने व रोटरी ब्लड बँक, क्रिटीकेअर लाईफलाइन हॉस्पिटल पनवेल, शंकरा आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. नवीन पनवेल येथील दारूल अमन ट्रस्ट च्या मस्जिदीच्या आवारात हे शिबिर पार पडले.



धर्माने सांगितलेल्या "त्याग" या मूल्यास अनुसरून सर्व धर्मियांनी एकत्र येऊन मानवतेचा संदेश देणारा हा रक्तदान उपक्रम गेली ७ वर्षे विविध सामाजिक संघटनांमार्फत राबविला जात आहे. यावर्षी शंभरहून अधिक जणांनी याचा लाभ घेतला. २३ जणांनी रक्तदान केले. यावेळी दारूल अमन ट्रस्टचे ए. एम. इनामदार, अल्लाउद्दीन शेख, असिफ कुरेशी, आरती नाईक, बगाडे काका, प्रवीण जठार, बाबासाहेब चिमणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

एक थेंब तुमचं रक्त, कुणाचं तरी आयुष्य वाचवू शकतं! धर्म, जाती, वर्गापलीकडे जाऊन एकत्र येऊया – मानवतेसाठी रक्तदान करूया! हा संदेश देत महा. अंनिस शाखा पनवेल, महाराष्ट्र मायनॉरिटी एनजीओ फोरम पनवेल, ए. एफ. टी. ट्रस्ट पनवेल, मक्तब ए नुरुल उलूम, आई समाजकल्याण संस्था वावंजे, संविधान प्रचारक, सर्वोदय, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन या संस्थानी हा उपक्रम राबविला.

# वाकद गावामध्ये उप कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करा

दैनिक युवक आधार
रिसोड तालुका प्रतिनिधी.
रणजीत सिंह ठाकुर

वाकद गावाला लागून बालखेडा महागाव गोहगाव गुंजखेडा पिंपरखेड वाडी धोडप असे अनेक खेडे जोडलेले असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामाकरिता वाकद हे गाव सर्व खेड्यांना जवळ पडल्या कारणाने वाकदे ते एक छोटी बाजारपेठ निर्माण झालेली आहे यास सर्व आजूबाजूच्या खेड्यातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्री करण्यासाठी रिसोड लोणार मेहकर वाशिम हिंगोली या ठिकाणी जावे लागते अनेक वेळा शेतकऱ्यांना बाजार समितीमध्ये मालाची आवक मोठ्या प्रमाणात असली तर त्यांना मुक्काम करण्याची पाळी सुद्धा येऊ शकते त्यामुळे हा शेतकऱ्याचा संपूर्ण त्रास वाचण्यासाठी मी आपल्या राज्याचे कर्तबगार शेतकऱ्यांचे कैवारी पणन मंत्री जयकुमार जी रावल साहेब यांच्या सोबत त्यांच्या मंत्रालयीन दालनामध्ये भेट घेऊन माझं वाकद गाव असल्याकारणाने मी याबाबत मागणी केली असता त्यांनी तात्काळ वाशिम जिल्हा उप निबंधक अधिकारी यांना याबाबतीत भेट घेण्याचे सांगितले त्या अनुषंगाने ही उपबाजार समिती वाकद गाव मध्ये अस्तित्वात करण्यासाठी वाकद ग्रामपंचायत चा ठराव महत्त्वाचा आहे त्यासाठी वाकद ग्रामपंचायतचे सरपंच सन्माननीय अमोल जी देशमुख व वाकद ग्रामपंचायत सदस्य सन्माननीय अखिल भाई गणेश मोरे शेख बिलाल भाई गजानन तिरके बालाजी लाटे गोपाल चोपडे ंच्यासोबत चर्चा करून त्यांना ठरावाची मागणी केली यावेळी त्यांनी आपल्या गावाच्या हितासाठी कोणताही विचार न करता मी तुम्हाला ग्रामपंचायत ठराव देतो असा होकार दिला त्यानुसार आपल्या वाशिम जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक श्री कच्छवे साहेब यांना आज त्यांच्या कार्यालयीन जालनामध्ये जाऊन निवेदन देऊन चर्चा केली असता त्यांनी लवकरात वाकद येथे उप कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याकरिता तुमच्या पाठ पुराव्याची दखल घेतल्या जाईल आणि लवकरच कारवाई करू असे आश्वासित केले यामध्ये सर्व गावकऱ्यांची हित असल्यामुळे वाकद येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची उपबाजार समिती व्हावी याकरिता सर्वांनी यासाठी पुढे यावे वरिष्ठ पातळीवर चा पूर्ण पाठपुरावा करण्याकरिता मी पुन्हा कायम प्रयत्न करेल वाकद उपबाजार समिती होण्याकरिता सर्वच गावकरी मंडळींनी सहकार्य करावे असे आव्हान भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर यांनी केले



## मान्सून येण्यापूर्वीच बळीराजाची चाड्यावर मूठ!

दैनिक युवक आधार
प्रशांत तांबोळकर लातुर

**शिरूरआनंतपाळ** : लातुर जिल्ह्यात व परिसरात तीन ते चार दिवसांपासून झालेल्या मध्यम व दमदार पावसामुळे शेतकरी समाधानी दिसून येत आहे. मान्सूनपूर्व झालेला पाऊस खरीप हंगामासाठी पूरक असल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीत व्यस्त आहे. येरोळ व परिसरातील जांभळवाडी, सुमठाना, चामरगा, पांढरवाडी, नागेवाडी, हानमंतवाडी या भागात मान्सूनपूर्व पावसाने वेळेवर हजेरी लावल्याने शेतकरी खरीपाच्या तयारीला लागले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वत्रच पेरणीपूर्व मशागतीला वेग आला आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या भरोशावर चाड्यावर मूठ धरली आहे.

बी बियाणे, खते, औषधे खरेदी करण्यासाठी शेतकरी सावकार, आडते, पैपाहुणे मित्राकडुन उसने पैशे घेऊन आर्थिक तरतूद करू लागला आहे. बी खत घेण्यासाठी कृषी सेवा केंद्रावर गर्दी होत असुन डीएपी खत मिळत नसल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.



# औंढे गावचे सलग पंधरा वर्षे सरपंच व त्यांचे बंधू पुणे जिल्हा कृषी अधिकारी यांची 75 वी मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक युवक आधार
खेड : डॉ देवेंद्र ओव्हाळ

औंढे गावचे सलग पंधरा वर्षे बिनविरोध सरपंच राहिलेले व गावाला ग्रामस्वच्छता अभियान,गावातील अनेक तंटे निकाली काढून तंटामुक्त अभियान असे अनेक पुरस्कार मिळवून दिले वाडी वस्त्यांना नवीन रस्ते पाणी लाईट ने गावाशी जोडण्याचा प्रयत्न केला विविध कार्यकारी सोसायटी असेल किंवा गावातील दूध डेअरी असेल यामधून बोनस वाटण्याची सुरुवात त्यांनीच केली वैयक्तिक लाभाच्या योजना विहिरी घरकुले शेततळे पाझर तलाव केटी बंधारे ग्रामवर्दनी संस्थेच्या माध्यमातून पाणी आडवा पाणी जिरवा व झाडे लावा हा संपूर्ण गावभर प्रयोग राबवला याचा आजही फायदा झाडे मोठे होऊन गावाला होत आहे विविध सहकारी सोसायटीतून संडास बांधणीसाठी कर्ज उपलब्ध करून संपूर्ण गावाला हागणदारी मुक्त गाव केले गावात दळणवळणाची कोणतीही व्यवस्था नसल्याने तीन किलोमीटर पायी जाऊन एसटीला बसाव लागायचे त्याचवेळी त्यांनी गावातही एसटी चालू केली त्या काळात गावात दवाखान्यासाठी इमारत शाळेसाठी इमारती अंगणवाडी असे अनेक छोटे मोठे उपक्रम गावात राबवले त्यांना गावातून बाळशीराम चिंतामण शिंदे बबन नामदेव शिंदे, महादेव गोपाळे, कै.ज्ञानदेव कांबळे, कै. राम गुरुजी, कै.शंकर मनाजी शिंदे, (पोस्ट मास्तर), लक्ष्मण गणपत शिंदे, या गाव कारभारी व मुंबईमध्ये ग्रँड रोड या ठिकाणी गावची खोली असल्याने खोली व मंडळासाठी ही त्यांनी प्रयत्न केले. त्यामध्ये भागा धोंडू शिंदे यमना शंकर शिंदे मुरलीधर तबाजी शिंदे कै.दत्तू रामभाऊ शिंदे तुकाराम गोपाळे परशुराम तुकाराम शिंदे मारुती सबन शिंदे सतीश रामभाऊ शिंदे विष्णू गोविंद शिंदे तुकाराम शंकर शिंदे कै,शंकर लक्ष्मण शिंदे या कार्यकर्त्यांची खंबीर साथ लाभली त्या आदर्श सरपंचाचे नाव आहे सिताराम बाळासाहेब शिंदे नुकतीच त्यांची व त्यांचे बंधू दत्तात्रय बाळासाहेब शिंदे कृषी अधिकारी पुणे हे देखील तरुणांच्या मनावरती राज्य करणारे व्यक्तिमत्व आहे यांचा 75 वा वाढदिवस रिद्धी सिद्धी या ठिकाणी साजरा करण्यात आला आजही या कुटुंबातील सदस्य लताताई गोपाळे ह्या पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या सदस्य आहेत तर पुतणे प्रदीप शिंदे गावचे विद्यमान सरपंच आहेत या कार्यक्रमाला गावातील व नातेसंबंधातील 100% लोक उपस्थित होते व सामाजिक कार्यकर्ते राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामध्ये आमदार बाबाजी काळे,माजी सभापती अरुण शेठ चांभारे,जिल्हा परिषद सदस्य अतुल शेठ देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे कार्याध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे, क्राईम ब्रँच एपीआय नंदकुमार गोपाळे (मुंबई), मुंबई मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे, मा.सरपंच सतीश शिंदे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य बबनराव नामदेव शिंदे, नामदेव शिंदे चेअरमन परशुराम शिंदे, विलास शिंदे पोलीस पाटील असे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यात्रा कमिटी अध्यक्ष दत्ताभाऊ शिंदे यांनी केले




# कोकणाचा जलदगतीने विकास करण्यासाठी रस्ते, महामार्ग उभारणार -- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

दैनिक युवक आधार
प्रतिनिधीः-सचिन पवार
माणगांव रायगड

माणगांव - नैसर्गिक सौंदर्याने समृद्ध कोकणाचा जलदगतीने विकास व्हावा यासाठी रस्ते व महामार्ग उभारून प्रवासाचा वेग कमी करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. प्रवासाचा वेग कमी करण्याची गरज लक्षात घेऊन मुंबई गोवा महामार्ग पूर्ण करणे, मुंबई सिंधुदुर्ग ऍक्सेस कंट्रोल रस्ता बरोबरच अनेक रस्त्यांची उभारणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कुल माणगाव च्या नवीन इमारतीचे उदघाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, रोहयो मंत्री भरत गोगावले, खा. सुनील तटकरे, आ. महेंद्र दळवी, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, माणगाव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ऍड राजीव साबळे, संचालक अनिकेत तटकरे यांसह



संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले कोकणातील विकासाला गती देण्यासाठी येथील प्रवासाचा कालावधी कमी करण्याची गरज आहे. यासाठी राज्य शासनाने कोस्टल महामार्गावरील ९ खाडी पुलांचे काम सुरू केले आहे. तसेच मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबई ते सिंधुदुर्ग ऍक्सेस कंट्रोल रस्ता उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मुंबई गोवा महामार्ग वर माणगाव येथे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी माणगाव बायपासचे काम लवकरच मार्गी लावण्यात येईल. कोकणातील लोकांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मोठे प्रकल्प या ठिकाणी उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासन अनेक लोकांभिमुख प्रकल्प राबवून विकासाला चालना देत असल्याचेही श्री शिंदे यांनी सांगितले. राज्य शासनामार्फत महिला सक्षमकरणासाठी सुरु करण्यात आलेली लाडकी बहीण योजना किती ही अडचणी आल्या तरी बंद करण्यात येणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाने सीबीएसई शाळा सुरु करून ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली आहे ही कौतुकास्पद बाब आहे. या शाळेला मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे यांचे नाव दिले याचा विलक्षण आनंद आहे. मातोश्री गंगुबाई या शिक्षणासाठी खुप आग्रही होत्या. परिस्थिती मुळे मी शिक्षण घेऊ शकलो नव्हतो. परंतु नंतरच्या आयुष्यात मी पदवी आणि पुढील शिक्षण घेतले. तसेच मुलगा उच्चविद्याविभुषित आहे याचे समाधान असल्याचेही श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. आरोग्य आणि शिक्षण ही दोन्ही महत्वाची खाती आवर्जून स्वतः कडे घेतली असून त्या माध्यमातून अनेक लोकांभिमुख निर्णय घेण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.मराठीचा सन्मान राखायलाच हवा, मात्र जागतिक स्पर्धेला तोंड द्यायचे तर इंग्रजी देखील यायला हवे, त्याच दृष्टिकोनातून पालकांची मागणी पूर्ण करण्यासाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळामार्फत ही सीबीएसई शाळा सुरू करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भविष्यात या शाळेतून अनेक उत्तमोत्तम विद्यार्थी घडावेत अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी माणगाव शिक्षण प्रसारक संस्थेच्या कामाचा आढावा घेऊन संस्थेच्यापुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. खा. सुनील तटकरे यांनी संस्थेने माणगावात विविध शैक्षणिक दालने सुरू करून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे सर्व सामान्य आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना माणगावातच उच्च शिक्षण घेता येत आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होतील असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे अध्यक्ष ऍड राजीव साबळे यांनी केले. कार्यक्रमाला शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर, पदाधिकारी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

## बनावट ॲप घोटाळ्यातील कारवाईसाठी शिंगणापुरात धरणे आंदोलन

दैनिक युवक आधार
**(नेवासा प्रतिनिधी ) :** शनिशिंगणापूर मधील बनावट अप घोटाळ्याची तातडीने चौकशी व्हावी व तातडीने कारवाई व्हावी यासाठी काँग्रेस व विविध संघटणाकडून शिंगणापूर देवस्थान आवारात धरणे आंदोलन करण्यात आले. शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी, पुजाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत अपच्या ऐवजी बनावट अप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून तसेच बनावट देणगी पावती व बनावट QR च्या माध्यमातून करोडो रुपयाचा घोटाळा करून हा निधी आपल्या खाजगी खात्यावर वळून घेतला. यात देवस्थानची व देशभरातील शनिभक्तांची मोठी लूट या घोटाळा बहाद्दरांनी करून दाखवली. याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी देखील केली.तर देवस्थान प्रशासनाकडे त्यांनी परवानगी दिलेल्या अपबद्दल माहिती मागण्यात आली होती. यामध्ये धर्मदाय आयुक्त यांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव, करारनामा अशी माहिती मागण्यात आली होती. देवस्थान प्रशासनाने हि माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घातल्याने इतर अपची माहिती दाबण्याचा प्रयत्न केल्याने आज देवस्थान आवारात काँग्रेस व विविध संघटनाकडून देवस्थान आवारात भर उन्हामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी या घोटाळ्याचा तीव्र गतीने तपास करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी देवस्थान प्रशासनाने फक्त तीन अपवर कारवाईची मागणी करून इतर अपवाल्याना व बनावट पावती पुस्तकं घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घालणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. पूर्ण कारवाई होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे स्पष्ट केले. शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी या घोटाळ्यात देवस्थानचे कर्मचारी, पुजारी, अधिकारी सहभागी असल्याचा आरोप करत भाविकांच्या श्रद्धेला यांनी गंडा घातल्याचा आरोप केला. हरीश चक्रनारायण यानी देवस्थान आता सरकार जमा करण्याची वेळ आली असून प्रशासकाची याठिकाणी गरज आहे त्याशिवाय भ्रष्टाचार दूर होऊन कारभार सुरळीत होणार नाही. तसेच यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,महिला अध्यक्ष शोभा पातारे, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे,बहुजन वंचितचे विजयसिहं गायकवाड, संजय वाघमारे यांनी देखील याविरोधात मनोगत व्यक्त केले. तर आंदोलनात संजय होडगर, कानिफ जगताप, सुमित पटारे, संदीप मोटे, सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे, आदीसह शनिभक्त सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना निवेदन दिले यात पुढील आठ दिवसात योग्य तपास न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.



# दैठणा वाकी ग्रामस्थांचे पंचायत समिती कार्यालयासमोर विविध मागण्यासाठी आमरण उपोषण"

## आ सुरेश धस, तहसीलदार यांच्या उपोषणस्थळी भेटी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**

तालुक्यातील दैठणा वाकी ग्रामपंचायत मधील न.नं.८ असेसमेंट रजिस्टर करास पात्र असलेल्या जमीन सन २०२०-२१ सालाबदलची आकारणी यादीवर मिळकत क्र. २९६ व अशा प्रकारच्या अनेक मिळकतीवर झालेल्या खाडाखोड व ग्रामपंचायत गावठाण अतिक्रमीत जागा असुन मालकी नोंदी घेतल्या बाबत,ग्रा.पं. नमुना ८ ची लिस्ट रजिस्टरची चौकशी होणे बाबत,ग्रा.पं.अंतर्गत अनाधिकाराने रस्ते उकरणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी या मागण्यावर कारवाई न झाल्यामुळे पंचायत समिती आष्टी




कार्यालयासमोर वाकी येथील काही ग्रामस्थांनी अमरण उपोषणास बसले आहेत.

आष्टी तालुक्यातील दैठणा वाकी ग्रामपंचायत मध्ये अनेक प्रकारच्या अनियमितता आढळून येत असुन विषय क्र. १ नुसार दैठणा वाकी ग्रामपंचायत मधील न.नं.८ असेसमेंट रजिस्टर करास पात्र असलेल्या जमीन सन २०२०-२१ सालाबदलची आकारणी यादीवर मिळकत क्र. २९६ व अशा प्रकारच्या अनेक मिळकतीवर झालेल्या खाडाखोड व ग्रामपंचायत गावठाण अतिक्रमीत जागा असुन मालकी नोंदी घेण्यात आलेल्या आहेत त्या बाबत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे तसेच यापुर्वीही अनेक वेळा निवेदने दिलेले असुन त्यावर अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाहीत. तसेच विषय - २ नुसार ग्रा.पं. नमुना ८ ची लिस्ट रजिस्टरची चौकशी होणे आवश्यक असुन त्या मध्येही बऱ्याच प्रकारची अनियमितता दिसुन येत आहे व ३ ग्रा.पं. ने रस्ते तयार केलेले असुन संबंधीत नागरीकांनी वैयक्तीक स्वार्थासाठी सदर रस्ते उकरून रस्ते बुजविलेले आहेत. तरी अनाधिकाराने रस्ते करणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई होऊन सखोल चौकशी होवून संबंधीतावर योग्य ती कारवाई करण्यात यावी या मागण्यासाठी आष्टी पंचायत समितीसमोर सागर जगन्नाथ ससाणे,निखील जालींदर ससाणे,राहुल बाबासाहेब ससाणे,सचिन मच्छिंद्र ससाणे यांच्यासह आदी ग्रामस्थ आमरण उपोषणास बसले आहेत. या उपोषण कर्त्यांना आ सुरेश धस, तहसीलदार वैशाली पाटील यांनी भेटी देऊन विविध मागण्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

# शेवटी BMC कुंभकराची झोप उडाली!

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक मुकुंद कांबळे**

*BMC* पाईपलाईन लगत स्थानिक भूमिपुत्रांना रस्ता व प्राथमिक सोयी सुविधा मिळावा म्हणून 'विकास पाईपलाईन विभागाचा, स्थानिक भूमिपुत्रांनी आज एकत्र येऊन फ्री हिट मेघा विक्रम केला होता!

ऐतिहासिक निर्णय घडला म्हणजे चक्क स्थानिक भूमिपुत्रांची *मेघा गर्दी* पाहून *BMC विभागाची* झोप उडाली आहे!





*आठ राज्याचे प्रभारी* मुंबई नगरीचे रहिवासी सामाजिक मानव तज्ञ *सन्माननीय* *श्री: विनोद निकाळजे* *साहेब,* उपस्थित राहून आपल्या स्थानिक भूमिपुत्रांच्या अ ड ी अ ड च ण समजावून घेऊन आपल्या विकासाच्या गतीला मदत करण्याचा आश्वासन दिला आहे! बीएमसी पाईपलाईन लगत असलेल्या स्थानिक भूमिपुत्रांना प्राथमिक सोय सुविधा मिळवून देणारच असं शब्द साहेबांनी दिला आहे व तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त यांना विकास कामा करिता तपशील घेऊन अहवाल सादर करून विकास कार्य करण्यासाठी बैठक घेणार आहेत! सर्व मीटिंग व काम सोडून वेळात वेळ काढून आपल्या मदतीसाठी धावून आलेले *सन्माननीय: विनोद निकाळजे* साहेबांचे मनापासून धन्यवाद!

# खासदार सुप्रिया सुळे यांची पूरग्रस्तांना भेट

## अतिक्रमण काढण्याची केली मागणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



बारामती लोकसभेच्या लोकप्रिय खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी 8 जून रोजी इंदापूर तालुक्यात मागील काही दिवसात पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पाहणी दौरा करण्यात आला. सणसर येथील पूरग्रस्तांना भेट देत त्यांच्या अडचणी ऐकून घेऊन संबधीत अधिकारी यांना योग्य सूचना करण्यात आल्या. यावेळी सणसर गावात असणाऱ्या अडचणी याविषयी शेतकरी कृती समितीचे सदस्य विशाल निंबाळकर,शरद कांबळे,वैद्यकीय तालुका प्रमुख सुनील निंबाळकर यांनी पुराविषयी माहिती देऊन चालू असलेल्या पालखी महामार्ग बद्दल तक्रारी केल्या यावेळी जिल्हा अध्यक्ष सागर मिसाळ, तालुकाअध्यक्ष तेजसिंह पाटील,महारुद्र पाटील युवक तालुकाअध्यक्ष अनिकेत निंबाळकर,राहुल जगताप,किरण पाठक,बाला पाटील,विक्रम भैय्या निंबाळकर,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मे केन्स्पेक केमिकल्स कंपनीच्या मॅनेजमेंट मुळे कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

तळोजा आद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मे केन्स्पेक केमिकल्स प्रा ली कंपनीने स्थानिक १०४ तरुणांना कोणतेही ठोस कारण न देता कामावरून कमी केले आहे याबाबत गेली अनेक महिने हे कामगार बेरोजगार झाले आहेत १५ एप्रिल २०२५ पासून कामगारांनी कंपनी गेट समोर ठिय्या आंदोलन

सुरु केले आहे कंपनीतील मॅनेजमेंट हे कामगार आणि मालक यांच्या मध्ये गैरसमज करीत असल्याने मालक वृषभ व्होरा याना कामगारांची बाजू मांडू न देता अंधारात ठेऊन भडकवत असल्याचे कामगारांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास अहिरे ,रसाळ हे जबादार असल्याचे कामगारांनी सांगितले आहे .

तळोजा आद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मे केन्स्पेक केमिकल्स प्रा ली कंपनी मध्ये आजूबाजूच्या गावातील कामगार गेली दहा ते वीस वर्षे कंपनीच्या विविध विभागात काम करीत आहेत डिसेंबर २०२३ मध्ये कंपनीला आग लागल्याने उत्पादन प्रक्रिया बंद करण्यात आली होती कंपनी सुरु झाल्यावर परत आपल्याला कामावर घेतले जाईल या आशेने सर्व कामगार कंपनी सुरु होण्याची वाट बघत होते मात्र कंपनी सुरु झाल्यावर काही कामगारांना कंपनीने कामावर घेतेले मात्र स्थानिक भूमिपुत्र असलेल्या या १०४ कामगारांना घराचा रस्ता दाखवला या बाबत कामगारांनी विविध विभागाकडे पाठपुरावा करीत न्याय हक्कासाठी लढाई सुरु केली आहे ,कंपनी कंत्राटदाराच्या माध्यमातून बाहेरील कामगार आणून काम करून घेत आहे ,मात्र भूमिपुत्रांना सामावू घेण्यास टाळाटाळ करीत आहे .व्यवस्थापनातील काही मंडळी जाणीवपूर्वक मालक आणि कामगारांमध्ये संघर्ष घडवून आणत आहे कंत्राटदाराला हाताशी घेऊन बाहेरील कामगारांकडून काम करून घेत आहे कंपनीचे मालक व्होरा याना रसाळ अहिरे हि मंडळी काही कामगारांच्या बाबतीत भडकवत आहेत

.स्थानिक कामगार नको हि आडमुठी भूमिका घेत असलेले मॅनेजमईन्ट मधील रसाळ अहिरे यांच्या कुटुंबावर अन्याय झाल्यास त्यांनी काय केले असते आज आमही अनेक महिने रोजगारावाचून आहोत रसाळ, अहिरे मालकाची मर्जी राखण्यासाठी सगळ्या यंत्रणेला पाकीट पोहचवून आमच्यावर दबाव आणत आहे, पोलिसांना हाताशी धरून खोट्या केस कामगारांवर करीत आहेत , काही गुंड मॅनेजमेंट मधील अभय रसाळ,शाम अहिरे यांनी ठेवले असून ते कामगारांना धमकावत असल्याचे कामगारांनी सांगितले आहे.

मॅनेजमेंट मधील अभय रसाळ,शाम अहिरे ह्यांच्यामुळे तळोजा एम आय डी सी मधील वातावरण चिघळत आहे आम्ही अहिरे यांच्यावर विश्वास ठेऊन दोन वर्षे घालवली मात्र अहिरे हे आपल्या स्वार्थासाठी आणि आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे मिळवण्यासाठी मालक आणि कामगारनमध्ये संघर्ष घडवून आणत आहेत त्यामुळे कायदा आणि सुवव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास हे दोघे याला जबाबदार असतील असे कामगारांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे

# स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेमार्फत जागतिक अन्नसुरक्षा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड:** - स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेमार्फत मंगरूळ येथे जागतिक सुरक्षा अन्नदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.संस्थेच्या तालुकास्तरीय सखी अर्चना कोळी यांनी गावातील महिलांना विविध प्रयोग करून आजच्या युगात अन्नाचे महत्त्व पटवून दिले. तसेच तुम्ही जर सेंद्रिय शेतीकडे जास्त प्रमाणात ध्यान दिल्यास रोगराई वाढणार नाही व एक आर्थिक बाजू सांभाळून तुम्ही शेती कशी करू शकतात याची त्यांनी आपल्या खास शैलीतून महिलांना पटवून सांगितले. तुम्ही घरगुती बियाणे सुद्धा सेंद्रिय पद्धतीने तयार करू शकतात याचे महत्त्व पटवून दिले. तसेच स्वयम शिक्षण संस्था ही महाराष्ट्र राज्यात विविध जिल्ह्यात सेंद्रिय शेती व सकोश अन्नपदार्थ याचा आपल्या जीवनात कसा वापर होईल यासाठी काम करी त आहे. तरीही गावातील कार्यक्रमाला शेकडो महिलांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या आयोजन मंगरूळची सखी वंदना मरकड यांनी केले. तर कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे,अर्चना कोळी, शुभम कुमावत हे होते तर कार्यक्रमाला गावातील शेकडो महिला हजर होत्या




# मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संप्पन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्याचे विद्यमान आमदार व महाराष्ट्र राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वाढदिवसानिमित्त सपकळवाडी ता. इंदापूर येथे रविवार दि. 8 जून रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन सचिन सपकळ मित्र परिवार सपकळवाडी यांच्यामार्फत करण्यात आले होते. यावेळी गावातील तरुणांनी रक्तदान करून 124 बाटल्या संकलित करण्यात आल्या. या रक्तदान शिबिराचे उदघाटन ऍड प्रतिमा भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन सदस्य सचिन सपकळ तालुका अध्यक्ष हनुमंत कोकाटे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील माजी संचालक ऍड रणजित निंबाळकर नूतन संचालक सुचिता सचिन सपकळ माजी संचालक भाऊसाहेब सपकळ,युवा नेते वसंतराव जगताप,सरपंच तानाजी सोनवणे,कुंदन सपकळ,शुभम सपकळ,तुषार सपकळ, महेश सपकळ उपस्थित होते.




# पिंपळनेरचे भूमीपूत्र प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर ( रमाईसुत ) यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**नाशिक वार्ताहर**

पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर ( प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता , लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने नाशिक नगरीत काळीज माझं साहित्य व साहित्य समुह नाशिक या सामाजिक संस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात कवी प्रदीपगुरुजी पिंपळनेरकर लेखक, कवी साहित्यिक यांना नाशिक येथे राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते, कवी,




संपादक गुलाबराजा फुलमाळी, गिरणा गौरवचे सुरेश पवार, रविंद्र मालूजंकर , संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा बेंद्रे आम्ही मुंबईकर साप्ताहिकाचे संपादक वैभव सुर्यवंशी याच्या उपस्थितीत मानाचा फेटा, शाल श्रीफळ बुके व ट्रॉफी सन्मान पत्र देऊन टाळ्यांच्या कडकडाटात गौरवण्यात आले. प्रदिपगुरुजी हे पेशाने शिक्षक असून नुकतेच त्यांच्या दोन्ही पायांवर मोठी शस्त्रक्रिया झालेली आहे. अंथरुणाला खिळवून असतांनाही त्यांनी या काळात यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दोन काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यापैकी " बालमित्रांची छान छान गाणी" हा बालकाव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर असून " लाल पाणी मिळे रक्त" या काव्यसंग्रहाच्या लेखनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या काळात त्यांनी ३०० पेक्षा जास्त कवितेची रचना करून १५०-२०० सन्मानपत्रे प्राप्त केली आहेत. तसेच विविध ऑनलाइन काव्यसंमेलनात सहभाग घेऊन विविध पारितोषीके प्राप्त केली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आजारपणाच्या काळात यांना ४-५ पुरस्कारांनी देखील गौरवण्यात आलेले आहे. आजारपणात त्यांचा १० प्रातिनिधिक काव्यसंग्रहात देखील कवितेचा सहभाग आहे. त्यात पाऊस, मधुगंध, क्रांतीज्योती, वारसा, येरे येरे ढगोबा( बालकाव्यसंग्रह), भीम जन्माची गाथा, रानफूल, वसंत ऋतू, आठवणीचा कोपरा व दर्पण या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे त्यांच्या " बालमित्रांची छान छान गाणी" या बालकाव्यसंग्रहाच्या १००० प्रती छत्रपती संभाजीनगर जिल्हातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत मोफत भेट देण्यात येणार आहे. त्याकरिता त्यांनी " मानवता बुक फाउंडेशन" ची निर्मिती केली असून आपल्या प्रियजनांच्या नावे फक्त १००० प्रतींचा छपाई खर्च देणगी देऊन यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील कोणत्याही एका जिल्हासाठी १००० प्रती वाटाण्यात. यात पहिल्या पानावर त्यांच्या प्रियजनांचा फोटो व त्यांच्या स्मरणार्थ मोफत बालकाव्यसंग्रह वाटप. तर शेवटच्या पानावर ज्यांच्याकडून देणगी मूल्य प्राप्त झाले यांचा नामोल्लेख पुस्तकात असणार आहे. या उपक्रमाची सुरुवात गुरुजींच्या मातोश्रींनी केलेली असून कै. बाबुलाल सखाराम पगारे पिंपळनेरकर यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्हातील संपूर्ण जिल्हा परिषद शाळेसाठी श्रीमती रमादेवी बाबुलाल पगारे यांचेकडून देणगी मूल्य प्राप्त झालेले आहे. आपल्या राज्यातील इतर जिल्हांसाठी आपण ९८२३११३५९४ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊ शकता.

प्रदिपगुरूजी यांना यापूर्वी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा आदर्थ शिक्षक पुरस्कार २०१४, लापन्स क्लब ऑफ औरंगाबादचा श्रेष्ठ गुरुजन पुरस्कार, विद्यार्थी सहायता संघ मुंबईचा साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, मनुष्यबळ विकास अकादमीचा अष्टक्षेत्री गौरव पुरस्कार, अनिस कार्यगौरव राज्य पुरस्कार, मानव प्रबोधन अकादमीचा राज्य पुरस्कार, तसेच पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत आंतरराष्ट्रीय पुरस्कार या विविध पुरस्कारांनी यापूर्वी यांचा सन्मान झालेला आहे. गुरुजींनी आतापर्यंत ४५ वेळा रक्तदान केलेले असून समाजाचा रुहभाग म्हणून १५-१७ लाखांपर्यन्त लोकवर्गणीतून विविध शाळांचा कायापालट केलेला आहे. यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आमचा मानाचा मुजरा.

# वट पौर्णिमा (महिला अस्मिता दिन)

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

वट पौर्णिमा हा सण स्त्रीयांसाठी फक्त उपवासाचा दिवस नव्हे तर हिंदू पतीव्रतेंच्या ह्दयात अढळ स्थान असलेल्या सावित्रीच्या तत्त्वज्ञान ,दृढनिश्चय ,सुशिलता,त्याग सदाचार शालीनता पतीव्रता ह्या गुणांची स्वामीनी असलेल्या गुणवती कुळवती लावण्यवती सावित्री कडून शिकवण व अखंड आयुष्यभरासाठी प्रेरणा घेण्याचा दिवस म्हणजे वट पौर्णिमा. आज तसा जास्तच उशिर झाला होता , रस्त्यावर एका ठिकाणी बायकांची खुप गर्दी होती बघतो तर फणसांचा ढीग पडला होता आणि बायका खरेदी करायला जणु तुटून पडल्या होत्या , ते पाहून मला आठवण झाली अरे वट-पौर्णिमा परवा शुक्रवारी ना? आमच्या सावित्रीनं गेल्या आठवड्यात तसी तंबीच दिली होती की थोडी सुट्टी काढून घरी या वट-पौर्णिमा आहे. तर या वट-पौर्णिमेचा सण म्हणजे सत्यवान सावित्री विषयी सर्वांना माहीतच आहे .अश्वपती नावाच्या राज्याला मुल-बाळ नव्हते तो निपुत्रीक होता त्याने तप करून सुर्याला प्रसन्न केले पुत्रवंत होण्याचा वरदान मागितला ,सुर्याने पुत्री होईल असा आशिर्वाद दिला, पण आजच्या माणसांप्रमाणे त्याने हट्ट नाही केला की मला मुलगाच पाहिजे म्हणून ,सूर्याच्या वरामुळे राजाला मुलगी झाली म्हणून नाव सावित्री . सावित्री खूप हुशार ,गुणी आणि सर्व उपनिषदात निपुण होती त्याला आपल्या मुलीवर पूर्ण विश्वास होता म्हणूनच राजाने तीला तीच्या मणा सारखा पती निवडण्याचे स्वातंत्र्य दिले तिने कित्येक राजकुमारातुन द्युमत्सेन राजाचा मुलगा सत्यवानाची निवड केली पण त्याच वेळी सत्यवानाचे वडिल राजा द्युमत्सेनाचे काही कारणाने राजवैभव गेले आणि दोन्ही राजा -राणी अंध झाली,पण तिने आपला निर्णय बदलला नाही स्वतः नारदाने तिला समजावले की सावित्री हा सत्यवान कितीही चांगला गुणवान असला तरी त्याचे आयुष्य फक्त १ वर्षेच आहे पण तिने सांगितले जे व्हायचे होते ते झाले




आता काही बदल होणार नाही, हिंदू संस्कृती नुसार एकदा कुणाला पती म्हणून वरले मग दुसर्याचा विचारही करणे व्यभिचार .तर असी ही सावित्री अटल ,अढल ,सुलक्षणी पतीव्रता स्त्री . लग्नानंतर राजवैभव गेल्यामुळे अगदी कैवल्य नेसुन पती सोबत अरण्यात अगदी सुखाने राहायला गेली पण आज-कालच्या मुलींप्रमाणे विचारही केला नाही की मी माहेरी किती वैभवात होते पालापाचोळ्यांच्या पर्णकुटीत तिने स्वर्ग अनुभवला ,पती हाच परमेश्वर हाच सिद्धांत, सत्यवानाच्या अंतकाळाचा दिवस एक -एक करून जवळ येत होता ,आणि तो काळ दिवस उजाडला ,नित्यदिना प्रमाणे अग्नीहोत्रासाठी सुकी लाकडे आणायला जंगलात निघाला पण आज सावित्रीने पती सोबत जाण्याची सासू -सासर्याकडे याचना केली ,त्याच्या परवानगीने ती जंगलात गेली ,एका झाडावरील सुके लाकूड काढताना त्याला भोवल आली तो कसाबसा खाली उतरला सावित्रीच्या मांडीवर डोके ठेवून निपचिप पडला सावित्री आपल्या पदराने त्याला वारा घालु लागली , इतक्यात तिच्या समोर तेजस्वी कांतीचा रंगाने काळा महा भयंकर देव-पुरुष हातात फाशीचा दोर घेऊन रेड्यावर स्वार असा प्रकट झाला त्याच्या फासाच्या एका टोकाला सत्यवानाच्या पायाचा अंगठा अडकवून नेऊ पाहत होता ,सावित्रीने न डगमगता प्रश्न केला "हे देवा आपण कोण आहात आणि माझ्या पती ला आपण कुठे घेऊन निघालात " यम म्हणाला हे सावित्री मी काळदेव यमराज , तुझ्या पतीचा जिवणकाळ संपला आहे तुझ्या चारित्र्यशील तेज्यासमोर माझे यमदूत येऊ शकत नाहीत म्हणून मलाच स्वतः यावं लागलं इतक बोलुन यमराज सत्यवानाचे प्राण हरन करून दक्षिणेकडे निघाले पण सावित्रीने त्यांची पाठ सोडली नाही यमाने तिला खूप समजावले पण व्यर्थ त्याने सांगितले पतीचे प्राण सोडून काय पण माग तिने आपल्या सासू -सासर्याचे गेलेले वैभव आणि डोळे मागितले यमाने हे सर्व देऊन सुद्धा तिने यमाची पाठ नाही सोडली मग अजून काय माग म्हटल्यावर तिने आपल्या पित्याला पुत्र प्राप्तीचा वर मागितला ते देऊन सुद्धा ती थांबली नाही तेव्हा हताशपणे यम म्हणाले शेवटचा वर माग, तेव्हा सावित्री म्हणाली देवा दोन्ही कुळांसाठी मी मागितले आता माझ्यासाठी पूत्रवतीचा वर द्यावा यम घाई-घाईनं तथास्तु म्हणून पुढं जाऊ लागले पण चार पावले चालून तिथेच थबकले ,त्याची चुक त्यांना कळाळी पतीव्रता सावित्रीला पतीशिवाय मुले कशी होतील ते तिच्या चातुर्यावर प्रसन्न झाले आणि सत्यवानाला ४०० वर्ष आयुष्य व १०० पुत्र प्राप्तीचा आशिर्वाद दिला तो दिवस पौर्णिमेचा होता आणि ते झाड वडाचे, म्हणून स्त्रीया ह्या दिवशी आपल्या पतीच्या दिर्घायुषासाठी हा उपवास करतात भगिणीनो आपले अस्तित्व ओळखा ,तुम्ही या भारतभुमीच्या पुत्री आहात या मातीतुन अनेक असामान्य शक्ती जन्माला आल्यात वीरमाता जिजाबाई 'विरांगणा राणी लक्ष्मीबाई ,पतीव्रता सावित्री ,सत्वशिल अनुसया, त्यागमुर्ति सिता नावे घेऊ तितकी कमी आहेत .नारी कधीच अबला नव्हती समाजातील कोणतीही ताकद तिला कमजोर करु शकत नाही , तिला एकच गोष्ट कमजोर करु शकते ते म्हणजे तिच आत्मबल ते आत्मबल खचऊ नका फक्त योग्य आचरण करा आणि त्या शक्तींचा आदर्श समोर ठेवा,

ज्या माय-बहिणी ह्या वट-पौर्णिमेचा उपवास करणार आहेत त्यांना माझं इतकेच सांगन आहे जर तुम्ही तिचा उपवास करता तर तिच्या प्रमाणे आचरण करा, सावित्रीने राजवैभव गेल्यानंतरही झोपडीत राहून आपल्या अंध सासू- सासर्याची सेवा केली आजकालच्या सूनांप्रमाणे पतीला त्याच्या आई-वडिलांपासुन अलग नाही केले, सावित्रीने आपल्या सामर्थ्याच्या जोरावर पतीचे गेलेले प्राण आणले पण आपण प्राण नाही पण आपल्या,चारित्र्याचे रक्षण जरूर करू शकता,तुम्ही कुळाची मानमर्यादा , सासरच्या लोकांचा मानसन्मान आणि नवर्याची मर्यादा राखली तर तो खरा उपवास ठरेल . तर अशी होती सत्वशिल पतीव्रता हूशार सावित्री तिने दोन्ही कुळाचा उद्धार केला ,आणि त्याच श्रेय जाते ते तिच्या पित्याला त्याने मुलगाच पाहिजे असा विचार केला असता तर सावित्री जन्मलीच नसती पण आजकाल कित्येक सावित्र्या पोटातच मारल्या जातात, कुळाचा उद्धार कराण्यासाठी मुलगाच होणे जरुरी नाही, आपल्या मुलीला सावित्री सारखे आचरण चांगले संस्कार द्या . म्हणून "मुलगी वाचवा मुलगी जगवा" आणि तिला चांगली शिकवा. फुकट नाही म्हणत,
"मुलगी शिकली प्रगती झाली."

**अजय शिवकर**
**केळवणे पनवेल**

# विकास परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्ष पदी संदिप मानकर यांची निवड !!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**




**सिल्लोड** -अनाड ता.सिल्लोड येथील रहिवाशी असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संदिप मानकर यांची क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्ष निवड करण्यांत आली असून त्यांच्या निवडीमुळे विकास परिषदेच्या पायाभरणीला आणि कार्यकर्ता जोडणीला नव्याने उभारी मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय विश्रामगृहात ता.08 जून रोजी संपन्न झालेल्या मराठवाडा विभागीय आढावा बैठकीत संस्थापक अध्यक्ष उत्तमराव कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्रदेशाध्यक्ष प्रमोद कांबळे, कोअर कमिटी अध्यक्ष डॉ.संजय सांभाळकर, महिला आघाडी प्रदेश कार्याध्यक्षा मिनाताई मिसाळ हस्ते मानकर यांना निवडीचे नियुक्तीपत्र देण्यांत आले.

यांप्रसंगी प्रदेश सचिव निलेश त्रिभुवन, मराठवाडा अध्यक्ष सुरेश घोरपडे, महिला आघाडी मराठवाडा अध्यक्षा ज्योतीताई जाधव, मराठवाडा उपाध्यक्ष कैलास रामफळे, राजु मातंग, गजानन मानकर, अनिल दाभाडे, विजय मिसाळ, भरत मानकर, शामलताई मोरे, संतोष आर्सुड, नितीन उमाप आदींसहित मराठवाडा विभागातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लक्षांत घेऊन त्याआधी सरकारने अनुसूचित जाती आरक्षणाची वर्गवारी करुन मातंग समाजाला न्याय द्यावा याच अनुषंगाने क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषद राज्यभर आपली सदस्य नोंदणी करणार असून संघटनेच्या वतीने लक्षवेधी आंदोलन करुन सरकारचे लक्ष वेधणार असल्याचे प्रतिपादन नवनियुक्त प्रदेश कार्याध्यक्ष संदिप मानकर यांनी बोलतांना केले...!

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## सापळी.च्या उमेश सुरुसे यांनी जलसिंचन प्रकल्पां बाबत जलसंपदा मंत्री यांना दिले निवेदन.

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.

वाशिम जिल्ह्यातील वाशिम तालुक्यातील नामांकित सापळी येथील युवा शेतकरी उमेश रमेश सूरुसे यांनी गावाला व शेतीसाठी मुबलक पाणी मिळण्यासाठी सापळी ला धरण मंजूर झाले असून जल सिंचन प्रकल्पां बाबत जलसंपदा कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील. यांना दिले निवेदन मौजे. सापळी येथील धरण मंजूर झाले असून वरिष्ठ पातळीवर कामाची दिरंगाई होत असून तरी जलसंपदा मंत्री व मंत्रालयातील पाणीपुरवठा मंत्री यांनी मंत्री महोदयांनी वरिष्ठ पातळीवर सापळी गावातील संबंधित धरणाबद्दल योग्य रीतीने पाठपुरावा करून जलद गतीने कामास गती देण्यात यावी. जेणेकरून गावाला व शेतकऱ्यांना व गुराढोरांना व आजूबाजूच्या गावांना या प्रकल्पाचा फायदा होईल अशी ग्वाही.सापळी येथील युवा शेतकरी उमेश सुरुसे व सापळी गावकऱ्यांच्या वतीने केली आहे.


सापळी गावासाठी व शेतकऱ्यांसाठी युवा शेतकरी उमेश सुरूशे यांचे महाराष्ट्र जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले निवेदन.

## पर्यावरणदिनी कामोठे नवी मुंबई येथे अपंग, अंध नागरिक निवृत्त सैनिक, ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त श्री सुनील करपे सरांच्या पुढाकाराने निसर्गप्रेमी संस्था व सहकारी यांच्या वतीने आदिनाथ अल्पईन बिल्डिंग समोर ,अक्षर बिल्डिंग (जिओ मॅट्रिक्स) जवळ सेक्टर 25 कामोठे नवी मुंबई येथे अंध, अपंग, निवृत्त सैनिक, ज्येष्ठ नागरिक ,महिला व इतर सर्व मान्यवर नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी शिवसेना कामोठे शहराध्यक्ष श्री सुनील भाई गोवारी, भाजप शहर उपाध्यक्ष श्री शरद राव जगताप, गुड मॉर्निंग ग्रुप सदस्य,भाजप नेते श्री सुरेश शेठ खरात व सहकारी ,शुभांगीताई खरात, कामोठे कॉलनी फोरमचे एडवोकेट श्री समाधान जी काशीद साहेब व सहकारी, श्री दादू निकाळजे साहेब ,श्री जयप्रकाश जगताप साहेब, एडवोकेट विनायकजी पांडे साहेब, श्री बाळकृष्ण शिंदे साहेब व त्यांचे सहकारी , वाल्मिकी समाजाचे अध्यक्ष श्री रवी जी बहोत व इतर नागरिक असे या कार्यक्रमासाठी 200 ते 250 पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

श्री सुनील कर्पे सर हे वाशी, नेरूळ ,सीबीडी बेलापूर ,खारघर कामोठे ,आदई डोंगर पनवेल अशा ठिकाणी वर्षभर वृक्षारोपण तसेच त्यांना स्वतःच्या स्कुटीवर कॅनद्वारे पाणी घालण्याचे व संवर्धनाचे अविरत काम करत असतात. आतापर्यंत त्यांनी जवळजवळ या सर्व ठिकाणी पाचशेच्या आसपास झाडे लावलेले आहेत. झाडे लावा झाडे जगवा. श्री सुनील कर्पे सर अध्यक्ष निसर्ग प्रेमीसंस्था कामोठे नवी मुंबई यांनी आव्हान केले



## स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेमार्फत जागतिक अन्नसुरक्षा दिन उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

**सिल्लोड:-** स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेमार्फत मंगरूळ येथे जागतिक सुरक्षा अन्नदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.संस्थेच्या तालुकास्तरीय सखी अर्चना कोळी यांनी गावातील महिलांना विविध प्रयोग करून आजच्या युगात अन्नाचे महत्त्व पटवून दिले. तसेच तुम्ही जर सेंद्रिय शेतीकडे जास्त प्रमाणात ध्यान दिल्यास रोगराई वाढणार नाही व एक आर्थिक बाजू सांभाळून तुम्ही शेती कशी करू शकतात याची त्यांनी आपल्या खास शैलीतून महिलांना पटवून सांगितले. तुम्ही घरगुती बियाणे सुद्धा सेंद्रिय पद्धतीने तयार करू शकतात याचे महत्त्व पटवून दिले. तसेच स्वयम शिक्षण संस्था ही महाराष्ट्र राज्यात विविध जिल्ह्यात सेंद्रिय शेती व सकोश अन्नपदार्थ याचा आपल्या जीवनात कसा वापर होईल यासाठी काम करी त आहे. तरीही गावातील कार्यक्रमाला शेकडो महिलांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या आयोजन मंगरूळची सखी वंदना मरकड यांनी केले. तर कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे,अर्चना कोळी,शुभम कुमावत व गावातील शेकडो महिला हजर होत्या.




## सावता परिषदेच्या जालना युवक जिल्हाध्यक्षपदी योगेश भैय्या जाधव यांची फेर निवड

दैनिक युवक आधार
जालना/प्रतिनिधी



दि ०५/०६/२०२५ रोजी सावता परिषदेची विभागीय,जिल्हा कार्यकारी जाहीर करण्यात आली,समाज कार्यासाठी समाज संघटन हे ब्रीद घेऊन सावता परिषद मागील काही वर्षांपासून महाराष्ट्रभरात मोठ्या ताकदीने सक्रिय आहे.बदनापुर तालुक्यातील सेलंगाव येथील योगेश भैय्या जाधव यांची सावता परिषदेच्या युवक जिल्हाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली.ही निवड सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.कल्याणराव आखाडे यांच्या नेतृत्वाखाली योगेश जाधव हे मागील काही वर्षांपासून संघटनेत प्रभावीपणे एकनिष्ठ राहून कार्य करत आहेत.योगेश भैय्या जाधव हे बदनापुर तालुक्यातील सेलगाव येथील रहिवासी असून ते शिवराय,फुले,शाहू,आंबेडकरांच्या विचारांचे पाईक आहेत.संघटनेमध्ये कार्य करत असताना अनेक युवकांना त्यांनी संघटनेत सामील करून घेतले,तसेच विविध उपक्रम असो,महापुरुषांचे जयंती उत्सव असो,अथवा समाजउपयोगी कामे अत्यंत प्रभावीपणे करत असतात,त्यांच्या या समाज कार्याची तळमळ व कार्याची दखल घेत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या आदेशानुसार सावता परिषदेचे प्रदेश प्रभारी मयूर वैद्य प्रदेश अध्यक्ष गणेशजी दळवी युवक प्रदेश अध्यक्ष प्रविणजी गाढेकर प्रधान महासचिव राजीव काळे सर प्रदेश उपाध्यक्ष भास्कर गाढवे जालना जिल्हा आध्यक्ष अजित बुलबुले यांनी पत्रकाद्वारे सदरील नियुक्ती जाहीर केली.या नियुक्ती बद्दल योगेश भैय्या जाधव यांचे जिल्हाभरातून सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# बाराहून अधिक आयपीओ लाँच होणार

■ प्राथमिक बाजारात उत्साहाचे संकेत ■ ६५ कंपन्यांना निरीक्षणे प्राप्त, ६५ कंपन्यांना अंतिम मंजुरीची प्रतीक्षा

**नवी दिल्ली :** २०२५ च्या सुरुवातीचे काही महिने मंदावल्यानंतर प्राथमिक बाजारात पुनरुज्जीवनाचे संकेत दिसत आहेत. स्थिर होत असलेल्या दुय्यम बाजारामुळे आणि भू-राजकीय तणाव कमी झाल्यामुळे पुढील तीन ते सहा महिन्यांत डझनभर कंपन्यांनी त्यांचे आयपीओ लाँच करण्याची तयारी केली आहे, असे मर्चंट बँकर्सनी सांगितले.

भांडवल बाजारात प्रवेश करण्याच्या तयारीत असलेल्या कंपन्यांमध्ये एचडीएफसी बँकेची उपकंपनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल), कल्पतरू, रुबिकॉन रिसर्च, ऑल टाइम प्लास्टिक्स, रेग्रीन-एक्सेल ईपीसी इंडिया आणि पॅरामेसु बायोटेक यांचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले.

यव्यतिरिक्त, क्रेडिला, एसके फायनान्स, व्हेरिटास फायनान्स, पारस हेल्थकेअर, सीआयईएल एचआर सर्व्हिसेस, अवान्से फायनान्शियल सर्व्हिसेस, ड्रॉफ-केटल केमिकल्स इंडिया, ब्रिगेड हॉटेल व्हेंचर्स आणि श्रीजी शिपिंग त्यांचे आयपीओ लाँच करण्याचा विचार करत आहेत.


या सर्व कंपन्यांना बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडून आधीच मंजुरी मिळाली आहे. या कंपन्या विस्तार योजना, कर्जाची परतफेड आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी भांडवली खर्चाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निधी गोळा करत आहेत. गेल्या महिन्यात लक्झरी हॉटेल साखळी द लीलाचे मालक यांच्या स्क्लॉस बंगळुरूसह सहा आयपीओ लाँच झाल्यानंतर आता आणखी कंपन्या भांडवली बाजारातून निधी उभारण्यासाठी आयपीओ आणण्यास सज्ज झाल्या आहेत. तथापि, २०२५ मध्ये एकूण आयपीओ येण्याचे प्रमाण मंदावले होते. आतापर्यंत फक्त १६ कंपन्या सार्वजनिक इश्यू घेऊन आल्या आहेत, गेल्या वर्षी याच कालावधीत २९ आयपीओ आले होते. जागतिक आणि देशांतर्गत घटकांच्या मिश्रणामुळे शेअर बाजारामध्ये सुरू असलेल्या अस्थिरतेमुळे हे प्रमाण मंदावले आहे.

२०२४ मध्ये ९१ पहिल्या सार्वजनिक इश्यूंनी एकत्रितपणे १.६ लाख कोटी रुपये उभारले कारण मजबूत किरकोळ सहभाग, लवचिक अर्थव्यवस्था आणि वाढत्या खासगी भांडवली खर्चामुळे शक्य झाले. एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये २,५०० कोटींचे नवे इक्विटी शेअर्स आतापर्यंत, ६५ कंपन्यांना सेबीकडून अंतिम निरीक्षणे मिळाली आहेत आणि आणखी ६५ अंतिम मंजुरीची वाट पाहत आहेत, जे सार्वजनिक इश्यू लाँच करण्यापूर्वी एक आवश्यक पाऊल आहे.

प्रमुख कंपन्यांमध्ये, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेसच्या प्रस्तावित आयपीओमध्ये २,५०० कोटी रुपयांचे नवीन इक्विटी शेअर्स इश्यू आणि प्रमोटर एचडीएफसी बँकेकडून १०,००० कोटी रुपयांचा ऑफर फॉर सेल (OFS) समाविष्ट आहे, असे रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) च्या मसुद्यानुसार म्हटले आहे. सध्या, एचडीएफसी बँकेकडे नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी (एनबीएफसी) मध्ये ९४.३६ टक्के हिस्सा आहे. नवीन इश्यूमधून मिळणारी रक्कम एचडीबीच्या टियर-१ भांडवल आधाराला बळकटी देण्यासाठी वापरली जाईल. त्यामुळे वाढीव कर्ज आणि व्यवसाय वाढ यासारख्या भविष्यातील भांडवली गरजांना पाठिंबा मिळेल. आरबीआयच्या आदेशानुसार, उच्चस्तरीय एनबीएफसी म्हणून वर्गीकृत एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेसला सप्टेंबर २०२५ पर्यंत स्टॉक एक्स्चेंजमध्ये सूचीबद्ध करणे आवश्यक आहे.

### ‘या’ प्रमुख कंपन्या आयपीओ आणण्यास सज्ज

एचडीएफसी बँकेची उपकंपनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, कल्पतरू, रुबिकॉन रिसर्च, ऑल टाइम प्लास्टिक्स, रेग्रीन-एक्सेल ईपीसी इंडिया आणि पॅरामेसु बायोटेक यांचा समावेश




### ‘या’ कंपन्यांचा आयपीओ लाँच करण्याचा विचार

क्रेडिला, एसके फायनान्स, व्हेरिटास फायनान्स, पारस हेल्थकेअर, सीआयईएल एचआर सर्व्हिसेस, अवान्से फायनान्शियल सर्व्हिसेस, ड्रॉफ-केटल केमिकल्स इंडिया, ब्रिगेड हॉटेल व्हेंचर्स आणि श्रीजी शिपिंग

### एनएसडीएलच्या आयपीओमध्ये ५.०१ कोटी शेअर्सची ऑफर

दरम्यान, एनएसडीएलने त्यांच्या आयपीओमध्ये ५.०१ कोटी शेअर्स ऑफर करण्याची योजना आखली असून सुरुवातीच्या प्रस्तावित ५.७२ कोटी शेअर्सपेक्षा कमी आहे. सेबीने एनएसडीएलला त्यांची लिस्टिंग पूर्ण करण्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

# बँक ऑफ बडोदाकडून कर्जदरात अर्धा टक्का कपात

**एचडीएफसी बँकेकडून १० आधार अंकांनी कपात**



**नवी दिल्ली :** आरबीआयच्या व्याजदर कपातीनुसार रेपो रेटशी जोडलेला कर्जदर ५० आधार अंकांनी कमी केला आहे, असे सरकारी बँक ऑफ बडोदा (बीओबी)ने रविवारी सांगितले. त्यामुळे कर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, खासगी क्षेत्रातील एचडीएफसी बँकेने त्यांच्या मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड्स-बेस्ड लेंडिंग रेट (एमसीएलआर) मध्ये १० आधार अंकांची कपात केली आहे. त्यामुळे कर्जदारांचा हफ्ता कमी काही प्रमाणात होईल.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) पॉलिसी रेपो रेट अर्धा टक्का कमी केल्यानुसार बँकेने ७ जूनपासून त्यांचा रेपो लिंक्ड लेंडिंग रेट (आरएलएलआर) ५० आधार अंकांनी कमी केला आहे, असे बँक ऑफ बडोदाने एका निवेदनात म्हटले आहे. बँकेचा आरएलएलआर ८.१५ टक्के आहे, असे बँकेने म्हटले आहे. यासह, बँक ऑफ बडोदाने आरबीआयने केलेल्या अर्धा टक्के व्याजदर कपातीचा पूर्ण लाभ आपल्या कर्जदारांना दिला असल्याचे बँकेच्या निवेदनात म्हटले आहे.

एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटनुसार, नवीन एमसीएलआर दर ७ जूनपासून लागू झाले आहेत. या कपातीमुळे, एका दिवसासाठी आणि एका महिन्यासाठीचे दर १० आधार अंकांनी कमी होऊन ८.९० टक्के झाले आहेत. तीन महिन्यांचा व्याजदर १० आधार अंकांनी कमी होऊन ८.९५ टक्के झाला आहे, तर सहा महिन्यांचा आणि एका वर्षासाठीचा दर १० बेसिस पॉइंट्सने कमी होऊन ९.०५ टक्के झाला आहे. दोन वर्षांचा आणि तीन वर्षांसाठीचा कर्जदर दोन्ही पूर्वीच्या ९.२० टक्क्यांवरून ९.१० टक्के करण्यात आला आहे.

# एफडीआयमध्ये महाराष्ट्र, कर्नाटकचा हिस्सा ५१ टक्के

**नवी दिल्ली :** गेल्या आर्थिक वर्षात २०२४-२५ मध्ये देशात आलेल्या थेट परदेशी गुंतवणुकीत (एफडीआय) महाराष्ट्र आणि कर्नाटकचा हिस्सा तब्बल ५१ टक्के होता, असे उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभागाच्या (डीपीआयआयटी) ताज्या आकडेवारीनुसार दिसून येते.

एप्रिल-मार्च २०२४-२५ दरम्यान महाराष्ट्राने सर्वाधिक १९.६ अब्ज अमेरिकन डॉलर परकीय गुंतवणूक आकर्षित केली आणि देशाच्या एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी ३१ टक्के वाटा होता. गेल्या आर्थिक वर्षात कर्नाटकला ६.६२ अब्ज अमेरिकन डॉलर परकीय गुंतवणूक मिळाली, असे आकडेवारीवरून दिसून आले आहे. त्यानंतर दिल्ली (६ अब्ज अमेरिकन डॉलर), गुजरात (५.७१ अब्ज अमेरिकन डॉलर), तमिळनाडू (३.६८ अब्ज अमेरिकन डॉलर), हरयाणा (३.१४ अब्ज अमेरिकन डॉलर) आणि तेलंगणा (३ अब्ज अमेरिकन डॉलर) या दोन्ही राज्यांचा क्रमांक लागतो.

**‘डीपीआयआयटी’ची आर्थिक वर्ष २५ बाबत माहिती**

तज्ज्ञांच्या मते, महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक येण्याचे मुख्य कारण म्हणजे पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा हे आहे. पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याने ही राज्ये भारतात थेट परकीय गुंतवणुकीसाठी आकर्षक ठिकाणे बनत आहेत, असे एका अर्थतज्ज्ञाने सांगितले.

गेल्या आर्थिक वर्षात एकूण थेट परकीय गुंतवणुकीमध्ये समभागांमध्ये गुंतवणूक, मिळालेल्या उत्पन्नाची पुन्हा गुंतवणूक आणि इतर भांडवल यांचा समावेश आहे.

## जागतिक कल, चलनवाढीच्या डेटावर बाजाराची दिशा ठरेल

**नवी दिल्ली :** जागतिक बाजारातील कल, किरकोळ महागाईची आकडेवारी आणि विदेशी गुंतवणूकदारांच्या भूमिकेवर या आठवड्यात बाजाराची दिशा ठरेल, असे विश्लेषकांनी सांगितले. शिवाय, मान्सूनची प्रगती आणि व्यापार चर्चेवर गुंतवणूकदारांकडून लक्ष ठेवले जाईल, असे तज्ज्ञांनी नमूद केले. याव्यतिरिक्त, ग्रामीण भागातील ग्राहकोपयोगी वस्तूंची खरेदी, मान्सून आणि पेरणीच्या पद्धतींची प्रगती देखरेख केली जाईल, असे रेलिगेअर ब्रोकिंग लिमिटेडचे एसव्हीपी, रिसर्च-अजित मिश्रा म्हणाले. जागतिक आघाडीवर, व्यापार वाटाघाटींमधील घडामोडी आणि यूएस बाँड उत्पन्नातील हालचाली गुंतवणूकदारांच्या भावनांवर प्रभाव पाडत राहतील, असेही ते म्हणाले.

**‘एफपीआय’कडून जूनच्या पहिल्या आठवड्यात**

# ८,७४९ कोटींच्या समभागांची विक्री

**नवी दिल्ली :** मे महिन्यात गुंतवणूक झाल्यानंतर विदेशी गुंतवणूकदारांनी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भारतीय शेअर बाजारातून ८,७४९ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली. नव्याने काढून घेतलेल्या रकमेसह २०२५ मध्ये आतापर्यंत एकूण १.०१ लाख कोटी रुपये काढून घेण्यात आले आहे.


अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि वाढत्या अमेरिकन बाँड उत्पन्नामुळे एफपीआयने विक्रीचा मारा करून निधी काढून घेण्यात आला. मे महिन्यात १९,८६० कोटी रुपये आणि एप्रिलमध्ये ४,२२३ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक झाली, असे डिपॉझिटरीजच्या आकडेवारीवरून दिसून येते.

यापूर्वी, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) मार्चमध्ये ३,९७३ कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये ३४,५७४ कोटी रुपये आणि जानेवारीमध्ये ७८,०२७ कोटी रुपये काढून घेतले होते.

बाजारातील नकारात्मक वातावरण हे अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि वाढत्या अमेरिकन बाँड उत्पन्नामुळे निर्माण झाली. त्यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित मालमत्तेकडे वळले, असे मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंटचे असोसिएट डायरेक्टर-मॅनेजर रिसर्च हिमांशू श्रीवास्तव म्हणाले. याशिवाय, अदानी ग्रुपने इराणवरील कथित मंजुरी उल्लंघनाच्या अमेरिकेच्या चौकशीमुळे गुंतवणूकदारांचा विश्वास आणखी कमी झाला आणि प्रमुख इक्विटी निर्देशांक घसरले, असे ते म्हणाले.

तथापि, आरबीआयने अनपेक्षितपणे ५० आधार अंकांनी रेपो रेटमध्ये कपात आणि १०० आधार अंकांनी सीआरआर (कॅश रिझर्व्ह रेशो) मध्ये कपात केल्याने बाजारातील भावना लक्षणीयरीत्या वाढल्या. अमेरिका आणि चीनमधील विकासाच्या शक्यता अंधुक दिसत असताना, भारत एक लवचिक अर्थव्यवस्था म्हणून उभा आहे जी आर्थिक वर्ष २६ मध्ये ६ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ देऊ शकते. फक्त समभागांच्या उच्च मूल्यांकनांमुळे तेजी सुरू राहण्यासाठी फारसा वाव राहात नाही, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे व्ही. के. विजयकुमार म्हणाले.

इक्विटीज व्यतिरिक्त, २-६ जून दरम्यान एफपीआयने कर्ज सामान्य मर्यादेतून ६,७०९ कोटी रुपये आणि कर्ज स्वैच्छिक धारणातून ५,९७४ कोटी रुपये काढले. अमेरिकन आणि भारतीय बाँडमधील बाँड उत्पन्नातील कमी फरकामुळे ते कर्ज बाजारातही सातत्याने विक्री करत आहेत, असे विजयकुमार पुढे म्हणाले.




### नऊ कंपन्यांच्या बाजारमूल्यांत १ लाख कोटी रुपयांची भर

आघाडीच्या १० कंपन्यांपैकी नऊ कंपन्यांच्या बाजारमूल्यात गेल्या आठवड्यात एकत्रितपणे १,००,८५०.९६ कोटी रुपयांची वाढ झाली. रिलायन्स इंडस्ट्रीज आणि एचडीएफसी बँकेने शेअर बाजारातील आशावादी कलच्या अनुषंगाने सर्वाधिक वाढ झाली. गेल्या आठवड्यात, बीएसई सेन्सेक्स ७३७.९८ अंकांनी किंवा ०.९० टक्क्यांनी वाढला.

# सतपाल भानू यांच्याकडे एलआयसीचे एमडी, सीईओपदाचा अतिरिक्त कार्यभार

**नवी दिल्ली :** अर्थ मंत्रालयाच्या सेवा विभागाच्या मंजुरीनंतर सतपाल भानू यांनी विमा कंपनीचे एमडी आणि सीईओ म्हणून अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे, असे भारतीय जीवन विमा महामंडळाने (एलआयसी) रविवारी सांगितले.




अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने ७ जून २०२५ रोजीच्या पत्राद्वारे सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता दिली आहे. त्यामध्ये ८ जून २०२५ पासून ७ सप्टेंबर २०२५ पर्यंत किंवा नियमित पदावर असलेल्या व्यक्तीने पदभार स्वीकारेपर्यंत ३ महिन्यांच्या कालावधीसाठी महामंडळाचे सीईओ आणि एमडी यांचे आर्थिक आणि प्रशासकीय अधिकार आणि कार्ये सोपवण्यात आली आहेत, असे एलआयसीने नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे.

एलआयसीच्या चार एमडींमध्ये भानू हे सर्वात ज्येष्ठ आहेत. सिद्धार्थ मोहंती यांचा एलआयसीचे सीईओ आणि एमडी म्हणून ७ जून २०२५ रोजी कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे ही रिक्त जागा निर्माण झाली. मोहंती १९८५ मध्ये अप्रेंटिस ऑफिसर म्हणून विमा कंपनीत सामील झाले होते.

## ‘वापरलेल्या स्वयंपाकाच्या तेलासाठी मोहीम गरजेची’

**मुंबई :** वापरलेले स्वयंपाकाचे तेल पर्यावरणीय निकषांनुसार धोकादायक कचरा म्हणून वर्गीकृत केले जाते. परंतु जर ते संघटित पद्धतीने एकत्रित केले तर आपण हे प्रदूषक प्रणालीतून प्रभावीपणे बाहेर काढू शकतो आणि ऊर्जा उत्पादनाच्या मोठ्या कारणासाठी त्याचा वापर करू शकतो. काही देशांमध्ये वापरलेले स्वयंपाकाचे तेल प्रभावीपणे गोळा करण्यासाठी धोरणे आहेत. यामुळे केवळ प्रदूषण आणि तेल भेसळ कमी होण्यास मदत होत नाही तर जैव-इंधन उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल देखील उपलब्ध होतो, असे टर्बोनोव्हाचे संस्थापक ऋषी वैद्य म्हणाले.

# चीनमधून दुर्मिळ चुंबकांच्या आयातीसाठी वाहन उद्योगाचे सरकारला साकडे

**नवी दिल्ली :** प्रवासी कारसह विविध प्रयोगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या दुर्मिळ पृथ्वी चुंबकांच्या आयातीसाठी चीन सरकारकडून मंजुरी जलद मिळण्यासाठी वाहन उद्योगाने सरकारला साकडे घातले आहे.

उद्योग सूत्रांनुसार, विविध देशांतर्गत पुरवठादारांनी चीनमधील त्यांच्या स्थानिक विक्रेत्यांद्वारे चीन सरकारकडून मंजुरी मागितली आहे. तथापि, अद्याप कोणतीही मान्यता मिळालेली नाही, असे सूत्रांनी सांगितले. वाहन, गृह उपकरणे आणि स्वच्छ ऊर्जा यासह अनेक क्षेत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या चुंबकांचे जागतिक प्रक्रिया क्षमतेच्या ९० टक्क्यांहून अधिक चीन नियंत्रित करतो.

चीन सरकारने ४ एप्रिलपासून निर्बंध लादले आहेत. सात दुर्मिळ घटक आणि संबंधित चुंबकांसाठी विशेष निर्यात परवाने अनिवार्य केले आहेत. जपानमध्ये, चीनच्या निर्बंधांमुळे सुझुकी मोटरने आधीच त्यांच्या स्विफ्ट कारचे उत्पादन स्थगित केले आहे. गेल्या आठवड्यात, मारुती सुझुकी इंडियाचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी (कॉर्पोरेट अफेयर्स) राहुल भारती म्हणाले की, चीनने भारत सरकारने मान्यता दिलेल्या आणि चीन सरकारने मंजूर केलेल्या अंतिम वापरकर्ता प्रमाणपत्राची मागणी केली आहे. म्हणून ती प्रक्रिया सुरू आहे आणि उद्योग सरकारशी चर्चा करत आहेत, असे त्यांनी सांगितले.

डेलॉइट इंडियाचे भागीदार आणि ऑटोमोटिव्ह सेक्टर लीडर रजत महाजन यांनी नमूद केले की, ही कमतरता पुरवठा साखळीतील एक प्रमुख व्यत्यय आहे, विशेषतः ईव्हीसाठी कारण दुर्मिळ पृथ्वी धातू इलेक्ट्रिक मोटरमध्ये मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात.

# नुकत्याच केशव हरकळने मिळवलेल्या यशस्वी यशानंतर त्याचं भरभरून कौतुक करावं तितकं कमी आहे.

## त्याच क्षणी लहानपणची पंचवीस-तीस वर्षांपूर्वीची घटना आठवते

रेणाखळी गावातील माजी सैनिक श्री प्रकाश इंगळे यांनी यशस्वी देशसेवा करून परतलेला प्रसंग. रेणाखळी गावाच्या मातीला शौर्याची परंपरा लाभली आहे. या परंपरेची शान उंचावणारे पहिले वीर सैनिक म्हणजेच श्री प्रकाश इंगळे. भारतीय आर्मीमध्ये त्यांनी तब्बल सोळा वर्षे देशसेवा केली. रणभूमीवर शत्रूंशी दोन हात करताना त्यांच्या हातावर गोळी लागली होती – आजही त्या जखमेची खूण त्यांच्या शौर्याची साक्ष देत राहते. मात्र, दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्यांच्या या महान देशसेवेची, या गावाच्या प्रतिष्ठेची, तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासन आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी कुठलीच दखल घेतली नाही. त्यांना गावात परत आल्यानंतर कोणताही स्वागत सोहळा, कोणताही मानसन्मान मिळाला नाही – ही वेदना अजूनही मनाला खोलवर बोचते. श्री प्रकाश इंगळे यांच्या नशिबी आलेली उपेक्षा खरंच जीवाला बोच देणारी आहे. देशासाठी जीवाची पर्वा न करता सीमेचे रक्षण करणारा, शत्रूला मागे हटवून आपल्या मातीचं नाव




राखणारा हा सैनिक – परत येताना गावात स्वागतासाठी एक हार, एक गौरवाचा शब्द सुद्धा ऐकू येऊ नये, ही फार मोठी वेदना आहे. ज्यांच्या रक्ताने आपल्या गावाची माती पवित्र झाली, त्यांच्याकडे गावाने डोळे भरून पाहावं, त्यांच्या पराक्रमाला मान द्यावा, हीच खरी गावकऱ्यांची जबाबदारी होती. पण त्या स्वागताचा, त्या मानाचा एक ओलावा त्यांना लाभला नाही, याचं दुःख त्या वीर सैनिकाच्या मनात आजही खोलवर दडलेलं असावं, असं वाटतं. हे फक्त त्यांचं नाही, तर आपल्या गावाच्या माणुसकीचं आणि आदरभावनेचं अपयशही ठरलंय. *याच गावातून आणखी दोन सैनिकांची देशसेवेची ओळख पुढे आली – केशव आणि श्रावणे. केशवने नुकतीच भारतीय सेनेत भरती होऊन गावाचा मान वाढवला, तर श्रावणे यांचा सध्या सेनेत योगदान सुरू आहे. या तिघांनी – श्री प्रकाश इंगळे, केशव आणि श्रावणे – आपल्या गावाचा सन्मान जपण्यासाठी, राष्ट्रसेवेचा ध्यास घेतला. *आजच्या काळात, आपल्या गावातील प्रत्येक प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामपंचायत प्रशासनाला माझी नम्र विनंती आहे की, या तिन्ही सैनिकांचा 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 1 मे यासारख्या राष्ट्रीय सणांमध्ये विशेष कार्यक्रमाद्वारे सन्मान व्हावा. त्यांचं योगदान, त्यांचा शौर्यवृत्तीचा वारसा – हे पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारे आहेत.**गावाचा मान, गावाचा अभिमान जपणारे हे तिघे वीर सैनिक आहेत. त्यांच्या शौर्याला योग्य मान मिळणं – ही आपल्या गावाची ओळख ठरावी. आणि यापुढे प्रत्येक कार्यक्रमात, सार्वजनिक व्यासपीठावर त्यांना विशेष मानाचा आसन मिळावं, हीच अपेक्षा!*

आसाराम विरकर